आनंद सागर मंगल कार्यालय
शाकाहारी करिता

एका मंगलमय कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली. आता आनंद सागर मंगल कार्यालय येथे रात्रीच्या कार्यक्रमासाठी भव्य लॉन्स उपलब्ध.
* लग्न सोहळा * साखरपूडा * रिसेप्शन * वाढदिवस
* गेट टुगेदर * कॉन्फरन्स * सांस्कृतिक कार्यक्रम
आसना बायपास चौरस्ता, गोरक्षण, जवळ, देशमुख गॅस पंपासमोर कामठा (बु.) नांदेड
व्यवस्था: स्वागत मंडप डेकोरेटर्स, मो. 9325610507,7972904719

# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

जोशी बंधू यांचे ..!!
शंकर भट्ट मंगल कार्यालय

मंगल कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली आपल्या सेवेत..!!
(लग्न, साखरपुडा, मुंज, रिसेप्शन, वाढदिवस, बारसे, डोहाळ जेवण, स्वागत समारोह व ईतर...)
पत्ता : भगवान परशुराम चौक किनवट रोड भोकर मो. क्र. 9765983335/9960659975/9881881934/9527889927

* वर्ष ६४ वे * अंक १०८ * नांदेड * गुरूवार, दि. २४ एप्रिल २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# वाघा बॉर्डर बंद, पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्याचे आदेश; मोदींच्या बैठकीतून पाकवर स्ट्राईक

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या निवासस्थानी सीसीएस म्हणजे कॅबिनेट सुरक्षा सेक्युरिटीची बैठक संपन्न झाली. या बैठकीत पाकिस्ताविरोधात ५ मोठे निर्णय घेतले आहेत. पुढील ४८ तासांत पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सिंधू जल करारावर स्थगिती देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला असून वाघा बॉर्डर १ मे पर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे.

या बैठकीला संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शाह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्यासह परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर देखील या बैठकीला हजर होते. या बैठकीत वाघा बॉर्डर १ मे पर्यंत बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या बैठकीनंतर परराष्ट्र खात्याने पत्रकार परिषद घेऊन घेण्यात आलेल्या निर्णयाची माहिती दिली. त्यानुसार, पाकिस्तानची पूर्णत: कोंडी करण्यात आली आहे.



### कुणालाही सोडणार नाही –नरेंद्र मोदी

या हल्ल्यात जो कोणी सहभागी असेल त्याला सोडले जाणार नाही अशी ग्वाही त्यांनी दिली. पिढी त्यांच्या कुटुंबीयांना सांत्वन दिले. या भयानक गुन्ह्यामागे जो कोणी असेल त्याला शिक्षा केली जाईल असेही पंतप्रधान मोदी म्हणाले आहेत. आम्ही त्यांना त्यांच्या अजेंड्यात यशस्वी होऊ देणार नाही. दहशतवादविरुद्ध लढण्याचा निर्धार दृढ आणि दृढच आहे, असेही त्यांनी सांगितले.

### पाकिस्तानची ‘पाणी कोंडी’, सिंधू पाणी वाटप कराराला स्थगिती

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात कडक पावले उचलायला सुरुवात केली आहे. पाकिस्तानी नागरिकांना पुढील ४८ तासांमध्ये देश सोडण्याचे आदेश दिला आहे. तसेच अटारी वाघा बॉर्डर १ मे पर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय भारताने घेतला आहे. त्याही पुढे जाऊन भारताने पाकिस्तानची पाणी कोंडी करत सिंधू जल वाटप कराराला स्थगिती दिली आहे.

# २५ एप्रिलला सरपंचपदाची सोडत तहसिलनिहाय वेळापत्रक जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील सरपंच पदाच्या आरक्षणाची सोडत शुक्रवार, दि. २५ एप्रिल रोजी होणार आहे. या संदर्भात जिल्हा प्रशासनाने आज वेळापत्रक जाहीर केले आहे. ५ मार्च २०२५ ते ४ मार्च २०३० दरम्यान नांदेड जिल्ह्यात सार्वत्रिक निवडणुकीद्वारे गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी हे आरक्षण लागू असणार आहे.

नांदेड जिल्हयातील सर्व १६ तालुक्यामध्ये शुक्रवार, दि. २५ एप्रिल २०२५ रोजी तहसिल स्तरावर प्राधिकृत अधिकारी तथा तहसिलदार यांच्याद्वारे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व ना.मा.प्र पदाकरिता महिला आरक्षणासह सरपंच पदाकरिता सोडत कार्यक्रम संबंधित तहसिलदार यांच्या अधिपत्याखाली संबधीत तालुक्यांच्या उपविभागीय अधिकारी यांच्या नियंत्रणात पुढील प्रमाणे पार पडणार आहे. सर्व संबंधित नागरिकांनी व ग्रामपंचायत सदस्यांनी सदरचे सोडतीस उपस्थित राहण्याचे जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडून आवाहन करण्यात येत आहे.



अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व ना.मा.प्र. पदाकरिता महिला आरक्षणासह सरपंच पदासाठी हे आरक्षण जाहीर केले जाणार आहे. आरक्षणासाठी सोडत पुढीलप्रमाणे असेल. नांदेड व अर्धापूर तालुका उपविभागीय अधिकारी नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार नांदेड व अर्धापूर यांच्या कार्यालयात अनुक्रमे सकाळी १० व दुपारी ३ वा. भोकर व मुदखेड तालुक्यासाठी उपविभागीय अधिकारी भोकर यांच्या नियंत्रणात भोकर व मुदखेड येथे तहसिल कार्यालयात अनुक्रमे सकाळी १० व दुपारी ३ वा. उपविभागीय अधिकारी हदगाव यांच्या नियंत्रणात हदगाव व हिमायतनगर तहसिलमध्ये अनुक्रमे सकाळी १० व दुपारी ३ वा. किनवट व माहूर तालुक्यासाठी उपविभागीय अधिकारी किनवट यांच्या नियंत्रणात किनवट व माहूर येथे अनुक्रमे सकाळी १० व दुपारी ३ वा. धर्माबाद व उमरी तहसिलसाठी उपविभागीय अधिकारी धर्माबाद यांच्या नियंत्रणात तहसिल धर्माबाद व उमरी येथे अनुक्रमे सकाळी १० व दुपारी ३ वा., बिलोली व नायगाव खै. तहसिलसाठी उपविभागीय अधिकारी बिलोली यांच्या मार्गदर्शनात तहसिलदार बिलोली तहसिलदार नायगाव खै. तहसिलसाठी अनुक्रमे सकाळी १० व दुपारी ३ वा., देगलूर व मुखेड तहसिलसाठी उपविभागीय अधिकारी देगलूर यांच्या नियंत्रणात तहसिलदार देगलूर व मुखेड येथे अनुक्रमे सकाळी १० व दुपारी ३ वा., कंधार व लोहा तालुक्यासाठी उपविभागीय अधिकारी कंधार यांच्या नियंत्रणात तहसिल कंधार व लोहासाठी अनुक्रमे सकाळी १० व दुपारी ३ वा. आरक्षणाची सोडत निघणार आहे. सर्व सोडती २५ एप्रिल रोजी सकाळी १० व दुपारी ३ वा. त्या-त्या तहसिलमध्ये होणार आहेत.

# एकनाथ शिंदे जम्मू काश्मीरला रवाना, घटनास्थळी जाऊन आढावा घेणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर काश्मीरमध्ये अडकलेल्या पर्यटकांना परत आणण्यासाठी राज्य सरकारने कंबर कसली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे श्रीनगरसाठी रवाना झाले आहेत. शिंदे हे रात्री ८ वाजता श्रीनगरला पोहोचले आहेत. काश्मीरमध्ये अडकलेल्या पर्यटकांना परत आणण्याची जबाबदारी एकनाथ शिंदे पार पाडणार आहेत.

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर राज्यातील अडकलेल्या पर्यटकांना सुखरूप परत आणण्यासाठी शिवसेनेने पुढाकार घेतला आहे. या आधी खासदार श्रीकांत शिंदे आणि त्यांची एक टीम काश्मीरला गेली होती. आता स्वतः एकनाथ शिंदे हे काश्मीरला गेले आहेत. एकनाथ शिंदे हे त्या ठिकाणी जाऊन आढावा घेणार आहेत.

काश्मीरमध्ये अडकलेल्या पर्यटकांना परत आणण्यासाठी राज्य सरकारकडून विशेष विमानाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचा सर्व खर्च राज्य सरकार करणार आहे.

# राज्यात उष्णतेची लाट; नांदेडसह अनेक जिल्ह्यांना येलो अलर्ट

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात सध्या उष्णतेचा कहर सुरू आहे. विविध ठिकाणी तापमानात वाढ होऊन उन्हाचे चटके नागरिकांना सहन करावे लागतं आहे. गेल्या काही दिवसांत विदर्भात सर्वाधिक तापमानाची नोंद झाली आहे. पुढील ३ दिवस विदर्भात उष्णतेच्या लाटेचा इशारा देखील हवामान विभागाकडून देण्यात आला आहे.

जळगाव, अहिल्यानागर, पुणे, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, अकोला या जिल्ह्यांना उष्णतेचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. याठिकाणी उष्ण आणि दमट वातावरण असण्याची शक्यता असल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे.



विदर्भातील अमरावती, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, अकोला या जिल्ह्यांत २४ एप्रिलसाठी हीट वेव्हचा इशारा देण्यात आला आहे. त्याचबरोबर अकोला वगळता सर्व जिल्ह्यांना उष्णतेचा ऑरेंज अलर्ट सुद्धा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे.

आज मुंबईतील कमाल तापमान ३४ अंश सेल्सिअस इतके असण्याची शक्यता आहे. तर किमान तापमान २५ अंश सेल्सिअस इतके असू शकते. त्याठिकाणी मुख्यतः निरभ्र आकाश असल्याने उन्हाचा त्रास नागरिकांना जास्त होऊ शकतो. पुण्यातील कमाल तापमान ४० अंश सेल्सिअस तर किमान तापमान २३ अंश सेल्सिअस इतके असण्याची शक्यता आहे.

छत्रपती संभाजीनगरमधील कमाल तापमान ४२ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २५ अंश सेल्सिअस इतके असण्याची शक्यता आहे. त्याठिकाणी मुख्यतः निरभ्र आकाश असू शकते. २४ एप्रिलला नाशिकमधील कमाल तापमान ४१ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २२ अंश सेल्सिअस इतके असण्याची शक्यता आहे.

# पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांची माहिती देणाऱ्यांना २० लाखांचं बक्षीस

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देशात संताप व्यक्त केला जात आहे. या हल्लयात सहभागी असणाऱ्यांवर कठोरातील कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे. या हल्लयात सहभागी असणाऱ्या दहशतवाद्यांचे फोटो समोर आले आहेत. असे असतानाच आता केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. या दहशतवाद्यांची माहिती देणाऱ्याला सरकारने २० लाखांचं बक्षीस जाहीर केलं आहे.

पहलगाममध्ये हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांचा फोटो समोर आला आहे. या दहशतवाद्यांचे स्केचही जारी करण्यात आले आहे. हल्लयानंतर आता पहलगाममध्ये सर्वच यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. या दहशतवाद्यांचा कसून शोध घेतला जात आहे. पहलगामधील घनदाट जंगलांत हा शोध चालू आहे. पुढचे काही दिवस ही शोधमोहीम चालूच राहणार आहे. या दहशतवाद्यांच्या मुसक्या आवळण्यासाठी सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. सरकारने दहशतवाद्यांची माहिती देणाऱ्यांना २० लाखांचे बक्षीस जाहीर केले आहे.

# भारतीय सैन्याच्या तिन्ही दलांना तयार राहण्याच्या सूचना

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** काश्मीरच्या पहलगाम येथील बैसरन खोऱ्यात दहशतवाद्यांनी बेछूट गोळीबार करुन २६ भारतीयांचा जीव घेतल्यानंतर आता केंद्र सरकारकडून कठोर पावले उचलण्याचे संकेत देण्यात आले आहेत. पहलगाम दहशतवादी हल्लयाची बातमी समजल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट सोडून बुधवारी सकाळी दिल्लीत परतले. त्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी विमानतळावरच राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्याशी चर्चा केली. यानंतर दिल्लीच्या साऊथ ब्लॉकमधील केंद्रीय संरक्षण मंत्रालयात तिन्ही सैन्यदलांचे प्रमुख, अजित डोवाल आणि संरक्षण मंत्रालयाच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीनंतर भारतीय सैन्यदलाला अलर्ट मोडवर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे भारत आता पाकिस्तानावर पुन्हा एकदा सर्जिकल स्ट्राईक किंवा एअर स्ट्राईक करणार का, अशी चर्चा सुरु झाली आहे.

काहीवेळापूर्वीच संरक्षण मंत्रालयात ही बैठक पार पडली. या बैठकीला तिन्ही सैन्यदलांचे प्रमुख उपस्थित होते. या बैठकीअंती तिन्ही दलाच्या प्रमुखांना आपापले सैन्य तयार ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विशेषत: भारतीय वायूदल आणि नौदलाला अलर्ट मोडवर राहण्याचा आदेश मिळाला आहे. कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्यासाठी तयार राहा, असे सैन्यदलाला सांगण्यात आले आहे. त्यामुळे येत्या काही तासांमध्ये अथवा दिवसांमध्ये काहीतरी मोठी घटना घडू शकते का, याविषयी तर्कवितर्क बांधले जात आहेत. गेल्या काही तासांपासून दिल्लीत वेगवान घडामोडी सुरु आहेत.

# इयत्ता बारावीचा निकाल १५ जूनच्यादरम्यान लागणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** यंदा शिक्षण मंडळाकडून दहावी, बारावीच्या परीक्षाही लवकर घेण्यात आल्या होत्या. यंदा बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान घेण्यात आली होती. तर दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारीला घेण्यात आली होती.

निकालाची अधिकृत तारीख अजून बोर्डाने जाहीर केलेली नाही पण बारावीचा निकाल हा मे महिन्यातच लागणार असे सांगण्यात आले आहे. मे महिन्याच्या तिसर्‍या आठवड्यात किंवा १५ मेच्या दरम्यान बारावीचा निकाल लागणार आहे, असे बोर्डाकडून सांगण्यात आले आहे. यंदा पहिल्यांदाच निकाल मे महिन्यात लागणार असल्याने विद्यार्थ्यांना पुढील प्रवेशसाठी प्रक्रिया सुकर होणार आहेत. तर दुसरीकडे दहावीचा निकालही मे महिन्यात लागणार असल्याची माहिती येत आहे. १७ किंवा १८ मे ला दहावीचा निकाल लागण्याची शक्यता आहे.

# माजी महापौरांसह सहा जणांना अटक; वसरणी येथे जुगार अड्ड्यावर धाड

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या वसरणी येथे सुरू असलेल्या एका जुगार अड्ड्यावर नांदेड ग्रामीण पोलीसांनी कारवाई केली. यावेळी माजी महापौरांसह सहा जुगार्यांना अटक केली. अड्ड्यावरुन ७ हजार रुपये जप्त केले.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये वसरणी येथे एका बंद घरात काही जुगारी जुगार खेळत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांना मिळाली. त्या ठिकाणी बुधवार, दि. २३ एप्रिल रोजी दुपारी कारवाई केली. यावेळी तेथे ६ जुगारी सापडले. पोलिसांनी सोमनाथ तुकाराम तेजे (वय ५२ वर्ष), मधुकर मोतीराम ढवळे (वय ५५ वर्षे), उद्धव मारुती खराणे (वय ५४ वर्षे), मधुकर वामनराव खराणे (वय ४८ वर्षे), माधव व्यंकटराव खराणे (वय ५३ वर्षे), गंगाधर पूरभाजी मोरे (वय ६५ वर्षे) सर्व राहणार वसरणी, नांदेड यांचा समावेश आहे. गंगाधर मोरे हा माजी महापौर असून त्यांच्याकडून एकूण ७ हजार १० रुपयांचा नगदी मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यांच्याविरुद्ध नांदेड ग्रामीण ठाण्यात कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# मुंबईचा विजयाचा चौकार, हैदराबादला होम ग्राऊंडवर नमवलं

**हैदराबाद (प्रतिनिधी)–** हार्दिक पांड्याच्या मुंबई इंडियन्सनं आयपीएलमध्ये सलग चार सामने जिंकत जोरदार कमबॅक केलं आहे. या विजयासह मुंबई इंडियन्स गुणतालिकेत मोठी झेप घेतली आहे. मुंबई इंडियन्सनं सनरायजर्स हैदराबादला ७ विकेटनं पराभूत केलं. रोहित शर्मानं ७० आणि सूर्यकुमार यादवनं ४० धावा केल्या. सूर्यकुमार यादवनं मुंबईच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. रोहित शर्मानं चेन्नई नंतर हैदराबाद विरुद्ध अर्धशतक झळकावलं. सलग चौथ्या विजयामुळं मुंबई इंडियन्स गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर पोहोचली आहे. मुंबईनं यंदाच्या आयपीएलमध्ये आतापर्यंत ५ सामने जिंकले आहेत.

मुंबई इंडियन्ससाठी इम्पॅक्ट प्लेअर म्हणून मैदानात उतरलेल्या रोहित शर्मानं एकहाती किल्ला लढवला. रोहित शर्मानं चेन्नई सुपर किंग्ज विरुद्ध देखील दमदार फलंदाजी केली होती. सनरायजर्स हैदराबादच्या गोलंदाजांची धुलाई करत रोहित शर्मानं अर्धशतक केलं. मुंबईचा रियान रिकल्टनं ११ धावा करुन बाद झाला. तर, विल जॅक्सनं रोहित शर्माला चांगली साथ दिली. त्यानं २२ धावा केल्या. विल जॅक्स बाद झाल्यानंतर फलंदाजीला आलेल्या सूर्यकुमार यादवनं रोहित शर्माला साथ दिली. रोहित शर्मा ७० धावा करुन बाद झाला.

मुंबई इंडियन्स विरुद्ध घरच्या मैदानावर खेळणाऱ्या हैदराबादची सुरुवात निराशाजनक झाली. हैदराबादचा निम्मा संघ ३५ धावांमध्ये तंबूत परतला होता. यानंतर हेनरिक क्लासेन आणि अभिनव मनोहर यांनी ९९ धावांची भागीदारी करत संघाला सन्मानजनक धावसंख्येपर्यंत पोहोचवलं. हैदराबादनं २० ओव्हरमध्ये ८ बाद १४३ धावा केल्या. हेनरिक क्लासेन यानं ४४ बॉलमध्ये ७१ धावा केल्या.

# चिखली येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला आ. चिखलीकर यांची दोन एकर जमीन दान

**नांदेड (प्रतिनिधी)–** लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी स्वतःची दोन एकर जागा प्राथमिक आरोग्य केंद्राला प्रतिभाताई प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दान दिली असून, बुधवार दि. २३ एप्रिल रोजी त्या जागेचे दानपत्र त्यांनी करून दिले आहे. त्यामुळे चिखली (ता. कंधार) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या उभारणीचा प्रश्न सुटला आहे.

कंधार तालुक्यातील चिखली हे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांची जन्मभूमी.त्या गावात बारावीपर्यन्त शिक्षणाची सोय त्यांनी उभारली आहे. शिवाय गावालगतच नॅशनल हायवे गेला. दळणवळणाची सोय व्हावी म्हणून मुख्य रस्त्याने राष्ट्रीय महामार्गाला गाव रस्त्याने जोडले आहे. गाव व आजूबाजूच्या खेड्यापाड्यांसाठी आरोग्याची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करून आणले, पण जागेअभावी इमारत उभी राहू शकली नव्हती. आ. प्रतापराव पाटील यांच्या सुविद्य पत्नी प्रतिभाताई प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी चिखली (ता. कंधार) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास स्वतःची दोन एकर जागा दान दिली. त्याचे दानपत्र कंधार येथील रजिस्ट्री ऑफिसमध्ये करण्यात आले. ते दस्त नोंदणी जिल्हा आरोग्य अधिकारी संगीता देशमुख व कंधार उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार यांच्याकडे प्रतिभाताई यांनी सुपूर्द केले. प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी स्वतःची दोन एकर जागा दान दिली म्हणून जागा जिल्हा आरोग्य अधिकारी संगीता देशमुख यांनी प्रतिभाताई चिखलीकर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी कंधारचे दुय्यम निबंधक सुनील रहाटकर उपस्थित होते.



आपल्या जन्मभूमीसाठी सामाजिक ‘दायित्व’ निभावत आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी स्वतःची दोन एकर जमीन प्राथमिक आरोग्य केंद्राला दान दिली. त्यामुळे दवाखाना होण्याचा मार्ग आता मोकळा झाला असून, चिखली व आजूबाजूच्या वीस पंचवीस खेड्यातील नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहे. चिखलीवासीयांनी आपल्या भूमीपुत्राला नेहमीच अडीअडचणीत समर्थपणे साथ दिली त्याच भूमिपुत्राने आपल्या गावासाठी सुविधा व्हावी म्हणून दोन एकर जमीन दान दिली व सामाजिक दायित्व स्वीकारले आहे. या निर्णयाचे गावकऱ्यांनी स्वागत केले आहे.

# पहलगाम हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांना महाराष्ट्र सरकारकडून मदत जाहीर

**मुंबई (प्रतिनिधी)–** जम्मू-काश्मीरच्या पहलगाम भागात मंगळवारी दुपारच्या सुमारास दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यामुळे देशभरात खळबळ उडाली. देशाच्या अनेक भागातून आलेल्या पर्यटकांवर दहशतवाद्यांनी हल्ला केला. या हल्लयात २६ पर्यटकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. जम्मू-कश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण देशात सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. जम्मू-कश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातील ६ नागरिकांचा मृत्यू झाला आहे. पहलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्लयात प्राण गमवावे लागलेल्या महाराष्ट्रातील एकूण ६ जणांच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपयांची आर्थिक मदत राज्य सरकारने जाहीर केली आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# सरकारी शाळाच मृतप्राय होतायेत!

शिक्षण व्यवस्था ही केवळ शिक्षक व शिक्षण खात्यापुरती मर्यादित नसून ती समाजाच्या संपूर्ण आराखड्याशी जोडलेली आहे. जर ही व्यवस्था कोलमडली, तर गरिबांचे आणि सर्वसामान्यांचे शिक्षणाचे दरवाजे बंद होतील. त्यामुळे सरकारी शाळांचे अस्तित्त्व वाचवणे ही केवळ एक धोरणात्मक गरज नाही, तर सामाजिक जबाबदारीही आहे. या महाराष्ट्रात फुले-शाहू-आंबेडकरांनी शिक्षणाच्या माध्यमातून परिवर्तन घडवण्याचा विचार रुजवला, तिथे शिक्षणाच्या पायाभूत रचनेलाच मार लागेल, हे मान्य करता येणार नाही. त्यामुळे वेळ आली आहे, की शासन, शिक्षक, पालक आणि नागरिक हे सर्वजण एकत्र येऊन सरकारी शाळा वाचवण्यासाठी ठोस कृती करण्याची. कारण शिक्षणाचा पाया जितका मजबूत, तितका समाजाचा कणा ठाम. सरकारी शाळा टिकल्या, तरच समतेची शिकवण आणि समावेशक प्रगतीचा मार्ग खुला राहील. सध्याच्या परिस्थितीत सरकारी शाळांचे अस्तित्त्वच धोक्यात आले आहे. हे वास्तव केवळ आकड्यांतून नव्हे, तर ग्रामीण भागांतून स्थलांतरित होणाऱ्या कुटुंबांमधून, ओस पडलेल्या वर्गखोल्यांतून आणि पटसंख्या घटलेल्या शाळांमधून स्पष्टपणे जाणवते. आज राज्यातील अनेक जिल्हा परिषद व महापालिका शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत. कारण स्पष्ट आहे, गुणवत्तेचा अभाव, पायाभूत सुविधांची कमतरता आणि शिक्षण धोरणांतील गोंधळ. शिक्षण क्षेत्रात गुंतवणुकीचा अभावही याला कारणीभूत ठरतो. १९६४ साली कोठारी आयोगाने सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या ६% खर्च शिक्षणासाठी राखण्याची शिफारस केली होती, मात्र आजही तो आकडा केवळ ४% आहे. ही स्थिती बदलण्यासाठी केवळ आकड्यांची नव्हे, तर मानसिकतेचीही गरज आहे. या संदर्भात शिक्षकांवर एकतर्फी जबाबदारी टाकणे ही चूकच म्हणावी लागेल. कारण प्रश्न केवळ पटसंख्येचा नाही, तर गुणवत्तेचा आहे. पालक आपल्या मुलांना कोणत्या शाळेत पाठवतात हे त्यांच्या अनुभवावर आणि विश्वासावर आधारित असते. सरकारी शाळांमध्ये जर दर्जेदार अध्यापन, स्वच्छ व सुरक्षित इमारती, शैक्षणिक साधने आणि डिजिटल सुसज्जता नसेल, तर इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळांकडे ओढा होणारच. शासकीय शाळांच्या दुरवस्थेची उदाहरणे सर्वत्र दिसतात. अनेक जिल्हा परिषदेच्या शाळातील इमारती धोकादायक झाल्या आहेत. त्या नवीन बांधणे तर दूरच, परंतु त्याची डागडुजी देखील करण्यात आलेली नाही. शालेय गणवेश वितरणाची योजना असूनही, वेळेवर विद्यार्थ्यांना गणवेश मिळत नाहीत. या साऱ्या त्रुटींमुळे सरकारी यंत्रणेवरील विश्वास उडतो आणि पालक खासगी शाळांकडे वळतात. एकीकडे स्थलांतराचा परिणाम म्हणून काही भागांत शाळांची पटसंख्या घटते आहे, तर दुसरीकडे काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या जास्त असूनही शिक्षक अपुरे आहेत. शिक्षण हक्क कायद्यांतर्गत जरी कमी पटसंख्या असलेल्या शाळांत शिक्षक कार्यरत असले तरी, या व्यवस्थेतील विसंगती दूर करण्यासाठी व्यापक धोरणाची गरज आहे. शालेय शिक्षण विभागाने घेतलेला 'समूह शाळा' पॅटर्नचा निर्णय तात्पुरता उपयोगी वाटला, परंतु त्यामुळे 'गाव तेथे शाळा' ही संकल्पनाच धोक्यात आली. शिक्षकांची भरती, प्रशिक्षण, वेळेवर वेतन आणि अध्यापनाचे मूल्यांकन या सर्व बाबी गांभीर्याने हाताळण्याची गरज आहे. शिक्षण ही केवळ सरकारी योजना नव्हे, तर समाजाच्या भविष्याची गुंतवणूक आहे. दिल्लीत 'आप' सरकारने सरकारी शाळांचा दर्जा वाढवून त्यामध्ये पालकांचा विश्वास निर्माण केला. मुंबई पालिकेच्या शाळांनीही असेच काही प्रमाणात यश पाहिले. हे दाखवून देते की, इच्छाशक्ती, योग्य नियोजन आणि पारदर्शकतेची अंमलबजावणी असेल, तर सरकारी शाळांनाही बदलता येते.

# जमिनीतील पाण्याची काळजी कोणाला?



आपल्या भारतात जगातल्या एकूण लोकसंख्येपैकी सतरा टक्के लोकसंख्या निवास करते आणि पाण्याच्या उपलब्धतेचे प्रमाण मात्र फक्त चार टक्के आहे.याचे एक मोठे कारण म्हणजे भूगर्भातील घटत चाललेला पाण्याचा स्तर. दुर्दैव असे की, इतक्या वेगाने भूगर्भातील पाण्याची पातळी घटत चालली असताना देशात पाण्याच्या संरक्षणासाठी म्हणावी अशी उपाययोजना होताना दिसत नाही. त्यासाठी कार्यक्रम आखला जात असल्याचे ऐकायला मिळत नाही. यासाठी खास अशा कार्यक्रमाची निर्मिती किंवा विचारसुद्धा करण्यात आलेला नाही. वास्तविक अशी काही तरी यंत्रणा विकसित होण्याची आवश्यकता आहे, अन्यथा आपल्याला अल्पावधीतच फार मोठ्या जलसंकटाला तोंड द्यावे लागणार आहे.

युनिस्कोच्या एका अहवालानुसार गेल्या दहा वर्षांत भूजल स्तर ६५ टक्क्यांनी खाली गेला आहे. भूजलाचा वापर करण्यात भारत जगात पहिल्या क्रमांकावर आहे. इथे ८० टक्क्यांपेक्षा अधिक पाण्याची गरज भूजलमधून भागवली जाते. सरकारी आकडेवारींमध्येही मान्य करण्यात आले आहे की, भारतात भूजलाचा बहुतांश भाग पाणी उपशासाठी वापरण्यात आला आहे. भारतात दरवर्षी गोड्या पाण्याचा जितका खप आहे, तितका जल संचय होताना दिसत नाही. जागतिक बँकेच्या चार वर्षांच्या आकडेवारीनुसार घरगुती,कृषी आणि औद्योगिक क्षेत्रासाठी दरवर्षी ७६१ मिलियन म्हणजे ७६ हजार १०० कोटी घनमीटर पाण्याचा वापर होत आहे. पाण्याची समस्या गडद होण्याचे आणखी एक मोठे कारण म्हणजे निम्म्यापेक्षा अधिक पाणी प्रदूषित आहे. उद्योग,कारखाने यांच्याकडून मोठ्या प्रमाणात पाणी प्रदूषित होत आहे. यामुळे अतिसार,टायफाइड आणि वायरल हेपेटाइटिस-बी सारखे आजार पसरण्याचा धोका असतो.

केंद्रिय भूजल बोर्डाच्या एका अभ्यासानुसार जगातली प्रत्येक दहावी तहानलेली व्यक्ती भारतातल्या खेड्यात निवास करते. खरे तर हा आपल्या काळजीचा विषय व्हायला हवा, कारण आपण पाण्यासारख्या सर्वाधिक मूलभूत गरजेची व्यवस्था आपल्या लोकसंख्येसाठी करू शकत नाही. महिला सक्षमीकरण आणि बेटी पढाओ, बेटी बचाओसारख्या घोषणा आपण करत असलो तरी ग्रामीण भारतात पाणी आणण्याचे किंवा साठवणूकीचे काम मुख्यत: मुली आणि महिलांनाच करावे लागते. पाण्याची समस्या योग्य व्यवस्थापनाअभावी मोठे विक्राळ स्वरुप घेत आहे. निसर्गाने तर आपल्याला मोठ्या प्रमाणात पाण्याची उपलब्धता दिली आहे,परंतु त्याच्या वापराच्या उपयुक्त नेटवर्काच्याअभावामुळे आपल्याला तहानलेला राहण्याचा अभिशाप मिळाला आहे. उत्तर प्रदेशात ८९ टक्के, बिहारमध्ये ७८ टक्के, उत्तराखंडमध्ये ७५ टक्के आणि महाराष्ट्रात ७४ टक्के विहिरी,कुपनलिका,ओढे-नाले यांचा जलस्तर घटला असल्याने मोठी समस्या बनली आहे. १९८३ मध्ये साधारण १३२ फुटावर पाणी लागायचे आता तेच पाणी २०११ पर्यंत ५०० ते ८०० फुटावर लागत होते. या सहा-सात वर्षात आणखीणच बिकट चित्र पाहायला मिळत आहे.

खालावत चाललेला भूजल स्तर कोणत्या एका देशाचीच समस्या नाही, तर ती विश्वव्यापी आहे. याबाबतीत काम करणाऱ्या वाटर एड या संस्थेचे म्हणणे असे की, २०५० पर्यंत जगातील ४० टक्के लोकसंख्या ही पाणी संकटाच्या कवेत असणार आहे. सतत वाढत चाललेले वैश्विक तापमान आणि मोसमी वातावरणात होत असलेला अप्रत्यक्ष बदल यामुळे नद्या,तलाव, झरे कोरडे पडत चालले आहेत. जलक्षेत्रासंबंधीची प्रमुख सल्लागार कंपनी ईएच्या अभ्यासानुसार २०२५ पर्यंत भारत मोठ्या पाणी संकटाचा देश बनणार आहे. जाणकार आजदेखील पाण्याचे कमी धोकादायक संकट आहे, असे मानत नाहीत. वाटर एड ही संस्था वातावरण बदल याचे प्रमुख कारण असल्याचे मानते. या बदलामुळे एक तर मोठी वादळे येतात किंवा पूरस्थिती निर्माण होते अथवा मोठा दुष्काळ पडतो. राजस्थान,उत्तर प्रदेश,दिल्ली परिसरात अशी परिस्थिती उदभवू लागली आहे.

आपल्या देशात मनमानी आणि बेसुमार पाण्याचा वापर होत आहे. पाण्याचा अपव्ययव आणि व्यवस्थापनेचा अभावदेखील पाणी समस्या निर्माण व्हायला कारणीभूत आहे. त्यामुळे डार्क झोन (असे ठिकाण जिथून पाणी काढणे शक्य होत नाही) वाढत चालले आहे. पाण्याचा अविवेक वापर आपल्याला चोहोबाजूला दिसत आहे. पण यावर प्रतिबंध घालण्याचा सुविचार कुणाच्या मनात येताना दिसत नाही. राजकीय पक्ष,लोकप्रतिनिधी आदींना फक्त आपण निवडून येण्याची व सत्तेवर बसण्याचीच चिंता अधिक दिसून येते. सरकारी अधिकाऱ्यांमधला वाढत चाललेला भ्रष्टाचार आणि त्यांना लोकप्रतिनिधींची मिळत असलेली साथ म्हणजे आपण दोघे भाऊ भाऊ, दोघे मिळून खाऊ, या नीतीची आहे. त्यामुळे देशावर ओढवलेल्या संकटांचा कुणी विचारच करताना दिसत नाही. आणि हे आपल्या देशासाठी धोकादायक तर आहेच आणि लोकशाहीसाठी दुर्दैवी आणि मारकही आहे. असे कधी कधी वाटते की, पाण्याचे व्यावसायिकीकरण केल्याशिवाय लोक सुधारणार नाहीत, त्यांना पाण्याची किंमत कळणार नाही. पण पाण्याची उपलब्धतेला क्रयशक्तीशी जोडणे योग्य होणार नाही. पाणी सर्वांची आणि काळाची गरज आहे. सर्वांच्या अस्तित्वासाठी आवश्यक आहे. पण पाण्याचा दुरुपयोग थांबवण्यासाठी दुसरा पर्याय स्वीकारण्याचीही गरज आहे.

भूजल स्तर कमी होण्याला फक्त पावसाचे प्रमाण कमी होणे हेच एक कारण नाही तर नैसर्गिक स्त्रोत आटणे, आणि अनियंत्रित विकासदेखील जबाबदार आहे. शेती,कारखान्यांना पाण्याची आवश्यकता भरपूर लागत आहे.अमर्याद वृक्षतोडदेखील त्याला कारणीभूत आहे. पूर्वी पावसाचे पाणी जमिनीच्या खाली साठवले जाऊन पाण्याची पातळी कायम राखली जात होती. आज तेच पाणी वाया जात आहे. रेन वॉटर हार्वेस्टिंगची अंमलबजावणी न होणे हा देखील भूजल स्तर कमी होण्याचे महत्त्वपूर्ण कारण आहे. शिवाय पाणी विषारी होणे, याहीपेक्षा मोठा चिंतेचा विषय झाला आहे. वाटर एड च्या शोध अहवालानुसार या गोष्टीला पुष्ठीच मिळाली आहे. या अहवालानुसार देशातल्या साडेचारशेपेक्षा अधिक जिल्ह्याचे भूजल खूपच प्रदूषित झाले आहे. या जिल्ह्यातल्या जमिनीतील पाण्यात फ्लोराइड, आर्सेनिक, आयर्न, शिसे, नायट्रेड सोडियम आणि क्रोमियमसारखे घातक रसायन मिसळत आहेत.

स्वातंत्र्य काळात देशात परमाणशी पाण्याची उपलब्धता सात हजार क्यूबिक मीटर होती. आता ती कमी होऊन २००१ मध्ये दोन हजार क्यूबिक मीटर उरली आहे. आता तर देशाची लोकसंख्या सव्वाशे कोटीच्यावर पोहचली आहे. भूशास्त्रज्ञांच्या मतानुसार २०२५-२६ पर्यंत ही उपलब्धता आणखी घटून बाराशे क्यूबिक मीटर राहील. जागतिक बँकेचे म्हणणे असे की, भारतात ४८ टक्के भागात पाण्याची समस्या आहे आणि त्यातील २४ टक्के पाणी विषारी बनले आहे. भू-शास्त्र अभ्यासानुसार जल संधारणासाठी चरी पाडणे महत्त्वाचे आहे. पावसाचे पाणी जिरवण्यासाठी सामान्य आकाराच्या तीन हजार चरी पाडल्या तरी त्यातून तीस कोटी लीटर पाणी जिरवू शकतो.

काही विकसनशील देशांमध्ये सरकार आणि सामान्य लोक यांच्या सहभागातून पिण्याच्या पाण्याची उपलब्धता वाढवल्याची उदाहरणे आहेत. आपल्या देशात वर्षा जल संचयाची परंपरा फार प्राचीन आहे. राजस्थानमध्ये पावसाचे पाणी सुरक्षित साठवून ठेवण्यासाठीचे काम सरकारी मदतीशिवाय सामाजिक स्तरावर कित्येक वर्षांपासून केले जात आहे. मंदिरांजवळ तलाव,विहीर बनवण्याची परंपरादेखील फार जुनी आहे. पण आज आपल्या धरणीकडून जितके पाणी आपण घेत आहे, त्याच्या तुलनेत आपण परत मात्र फार कमी देत आहोत. रोजच्या रहाटगाडग्यात पाण्याचा अपव्यय रोखूनही आपण पाणी वाचवू शकतो. पाण्याविषयीचा आपला विचार बदलण्याची गरज आहे. निसर्गाने पाणी मोठ्या प्रमाणात नि:शुल्क उपलब्ध करून दिले आहे, त्याचे खरे तर आभार मानण्याची गरज आहे. त्यामुळे पाण्याचा काटकसरीने आणि पाहिजे तेवढाच वापर करण्याची आवश्यकता आहे.

**-मच्छिंद्र ऐनापुरे**
जत, जि. सांगली

# भारतरत्नाचा वाढदिवस



क्रिकेट हा भारतातील सर्वाधिक लोकप्रिय खेळ आहे म्हणूनच क्रिकेट हा भारताचा धर्म आहे असे मानले जाते आणि खेळात सचिन तेंडुलकर याने जी असामान्य कामगिरी केली आहे त्यामुळे त्याला क्रिकेटचा देव मानले जाते. आज याच क्रिकेटच्या देवाचा म्हणजे सचिन तेंडुलकरचा ५० वा वाढदिवस आहे. २४ एप्रिल १९७३ रोजी मुंबईत सचिनचा जन्म झाला. त्याचे वडील रमेश तेंडुलकर हे प्राध्यापक होते तसेच मराठीतील प्रसिद्ध साहित्यिक होते तर आई शिक्षिका होत्या. त्या काळातील प्रसिद्ध संगीतकार सचिनदेव बर्मन ह्यांच्या नावावरुन त्याचे सचिन असे नाव ठेवण्यात आले. सचिनने शारदाश्रम विद्यामंदिर या शाळेत रमाकांत आचरेकर यांच्याकडून क्रिकेटचे धडे गिरवायला सुरवात केली. रमाकांत आचरेकर यांनी बालवयातच सचिनची गुणवत्ता हेरुन त्याला प्रशिक्षण दिले. शाळेत असतानाच सचिनने त्याच्या शाळेतील सहकारी मित्र विनोद कांबळी याच्यासोबत हॅरिस शिल्ड स्पर्धेत ६६४ धावांची विक्रमी भागीदारी रचली.

सचिनने त्याच्या पहिल्या प्रथम श्रेणी सामन्यातच शतक झळकवण्याचा विक्रम केला. तेंव्हा त्याचे वय १५ वर्ष २३२ दिवस होते आणि त्यावेळी पहिल्या सामन्यात शतकी खेळी करणारा तो सर्वात तरुण खेळाडू होता. सचिन हा असा एकमेव खेळाडू आहे ज्याने रणजी, दुलीप व इराणी चषकाच्या पहिल्या सामन्यात शतक झळकावले. देशांतर्गत क्रिकेटमध्ये अप्रतिम कामगिरी केल्याने वयाच्या १६ व्या वर्षीच सचिनची भारतीय संघात निवड झाली. १९८९ साली त्याने आपला पहिला आंतरराष्ट्रीय सामना पाकिस्तान विरुद्ध कराची येथे खेळला. त्या सामन्यात त्याने इम्रान खान, वसीम आक्रम, वकार युनूस, अब्दुल कादिर या दिग्गज गोलंदाजांचा सामना केला. अर्थात त्याला पहिल्या सामन्यात काही विशेष काही करता आले नाही. अवघ्या १५ धवांवर तो बाद झाला मात्र पुढच्या सामन्यात त्याने अर्धशतक झळकावुन आपल्या क्षमतेची चुणूक जगाला दाखवून दिली. त्यानंतर तो भारतीय संघासोबत न्यूझीलंड दौऱ्यावर गेला तिथे ८८ धावांची त्याने लाजवाब खेळी केली मात्र त्याला खरी ओळख मिळाली ती १९९१ - ९२ च्या ऑस्ट्रेलियन दौऱ्यात. या दौऱ्यात त्याने पर्थ मधील उसळत्या आणि वेगवान खेळपट्टीवर शतकी खेळी केली. ज्या खेळपट्टीवर जगभरातील दिग्गज फलंदाज तग धरू शकत नाही अशा खेळपट्टीवर सचिनने ऑस्ट्रेलियाच्या दर्जेदार गोलंदाजीसमोर शतक झळकवल्याने हा खेळाडू लंबी रेस का घोडा आहे असे जाणकार म्हणू लागले. त्यानंतर सचिनने मागे वळून पाहिले नाही.

जगभरातील सर्वच खेळपट्टीवर त्याने धावा काढायला सुरवात केल्या. १९९६ च्या विश्वचषकात त्याने सर्वाधिक धावा काढून गोल्डन बॅट मिळवली. १९९० च्या दशकात तर सचिनच्या बॅटने अक्षरशः धुमाकूळ घातला. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज, पाकिस्तान, श्रीलंका, झिम्बाब्वे अशा सर्वच संघविरुद्ध त्याने खोऱ्याने धावा केल्या. १९९७ साली विसडेनने त्याला त्या वर्षीचा सर्वोत्तम वार्षिक खेळाडू म्हणून घोषित केले. ह्याच वर्षी त्याने पहिल्यांदा कसोटीत १००० धावा केल्या. ह्याची सचिनने १९९९, २००१, २००२ साली पुनरावृत्ती केली. सचिनने वर्षात १००० पेक्षा जास्त धावा करण्याचा विक्रम सलग सहा वेळा केला आहे. असा करणारा तो एकमेव खेळाडू आहे. सचिन तेंडुलकर हा क्रिकेट विश्वात डॉन ब्रॅडमन यांच्यानंतर जागतिक स्तरावर सर्वोत्तम मानला जाणारा क्रिकेटपटू आहे.

२००२ मध्ये कारकिर्दीच्या बाराव्या वर्षीच, विसडेनने डॉन ब्रॅडमन यांच्यानंतर सार्वकालिक दुसरा सर्वोत्तम कसोटीपटू व व्हीव्ह रिचर्डस नंतरचा दुसरा सार्वकालिक सर्वोत्कृष्ट एकदिवसीय फलंदाज म्हणून सचिन तेंडुलकरची निवड केली होती. स्वतः डॉन ब्रॅडमन यांनी सचिनच्या फलंदाजीत स्वतःची छबी दिसते असे म्हटले होते. २००३ साली दक्षिण आफ्रिकेत झालेल्या विश्वचषक स्पर्धेत त्याला मालिका विराचा पुरस्कार देण्यात आला मात्र संघाला विश्वचषक जिंकता आला नाही याची त्याला खंत होती. देशाला विश्वचषक जिंकून द्यायचे हे त्याचे स्वप्न होते. हे स्वप्न २०११ साली पूर्ण झाले. सचिनचे दुसरे नाव म्हणजे विक्रम. विक्रमांचे विक्रम करण्याची असाधारण कामगिरी त्याने केली. त्यांचे विक्रम सांगायला गेलो तर पानही पुरणार नाही.

आंतरराष्ट्रीय सामन्यात १०० शतक करणारा तो एकमेव खेळाडू आहे. सर्वाधिक धावा, सर्वाधिक सामनावीर, सर्वाधिक मालिकाविर सर्वात जास्त सामने असे कितीतरी विक्रम त्याच्या नावे आहे. त्याला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. राजीव गांधी खेलरत्न, पद्मविभूषण या पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. भारतरत्न या देशाचा सर्वोच्च पुरस्काराने देखील त्याला गौरविण्यात आले. भारतरत्न मिळवणारा तो एकमेव खेळाडू आहे. तो राज्यसभेचा खासदारही होता. भारतीय हवाई दलाने त्याला ग्रुप कॅप्टन हा गौरवात्मक हुद्दा प्रदान केला आहे. त्याला अनेक विद्यापीठाची डिलीट ही मानाची पदवी मिळाली आहे. सचिनचा खेळ पाहतच आम्ही लहानाचे मोठे झालो. त्याचा खेळ पाहायला मिळाला हे आमच्या पिढीचे भाग्य. १३० कोटी भारतीयांना आनंद साजरा करण्याची संधी सातत्याने निर्माण करुन देणाऱ्या या क्रिकेटच्या देवाला ५० व्या वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा !

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# प्रबोधनकार लोककवीचे स्मरण!



२४ एप्रिल हा 'तूच सुखकर्ता, तूच दुखहर्ता', 'माझ्या नवऱ्याने सोडलीया दारू' यांसारखी एकापेक्षा एक सरस आणि जनमानसात खोलवर रुजलेली गाणी लिहिणारे प्रसिद्ध प्रबोधनकार लोककवी हरेंद्र जाधव यांचा चौथा स्मृतिदिन. लोककवितेच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन करणाऱ्या या थोर कलावंताच्या आठवणी आजही रसिकांच्या मनात ताज्या आहेत.

हरेंद्र जाधव यांचा जन्म १६ फेब्रुवारी १९३३ रोजी नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील मिग ओझर या गावात झाला. व्यवसायाने शिक्षक असले तरी मनाने ते पूर्णतः कवी होते. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी सामाजिक चळवळीचा मार्ग स्वीकारला. त्या काळात 'जलसा' हा जनजागृतीचा प्रभावी माध्यम होता आणि हरेंद्र जाधव यांनी याच माध्यमातून प्रबोधन करणारी गीते लिहायला सुरुवात केली. त्यांनी वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी पहिले गीत लिहिले. मात्र, त्यांचे पहिले गीत ध्वनिमुद्रित होण्यास तब्बल दहा वर्षे लागली. हेच त्यांचे ध्येयदृढतेचे आणि संयमाचे उदाहरण म्हणता येईल.

हरेंद्र जाधव यांच्या सिद्धहस्त लेखणीतून 'पहा पाहा मंजुळा, हा माझ्या भीमरावाचा मळा', 'हा संसार माझा छान राव दिला मला देवाने', 'अवघ्या दिनाच्या नाथा', 'आता तरी देवा मला पावशील का' यांसारखी प्रबोधनात्मक, भक्तिपर, सामाजिक आशयाची हजारो गीते निर्माण झाली. त्यांनी सुमारे १० हजारांहून अधिक गाणी लिहिली. या गाण्यांमध्ये समाजाच्या विविध समस्या, धार्मिक श्रद्धा, कुटुंबातील नातेसंबंध, आणि सामाजिक परिवर्तनाचा आग्रह या सर्वांचा सुरेख संगम दिसतो. 'माझ्या नवऱ्याने सोडलीया दारू' हे गीत आजही व्यसनमुक्तीच्या जनजागृतीसाठी प्रभावी माध्यम म्हणून आेळखले जाते. त्यांनी कोळीगीतेसुद्धा लिहिली, जसे की 'डोलकरा, माझे डोलकरा'जी आजही विविध कार्यक्रमांमध्ये रंगत आणतात. त्यांच्या गणेशभक्तीपर 'तूच सुखकर्ता, तू दुःखहर्ता' आणि 'आता तरी देवा मला पावशील का' या गाण्यांची गणेशोत्सवात अनिवार्य उपस्थिती असते. लोककवी हरेंद्र जाधव यांच्या गाण्यांना अजित कडकडे, सुरेश वाडकर, प्रल्हाद शिंदे, अनुराधा पौडवाल, साधना सरगम, बेला सुलाखे यांसारख्या सुप्रसिद्ध गायक-गायिकांनी स्वरबद्ध केले. त्यांच्या गीतांचा प्रभाव हा केवळ शब्दांत नव्हे, तर त्यातील भावना, सामाजिक जाण आणि लोकाभिमुखता यातून प्रकटते.

हरेंद्र जाधव हे कवी म्हणून केवळ भावविवशतेत अडकले नाहीत, तर त्यांनी लावणी, भक्तिगीते, कोळीगीते, प्रबोधनपर गीते आदी सर्वच प्रकार हाताळले. त्यांची कविता हे एक सामाजिक दस्तऐवज बनते, जिथे समाजाचे प्रतिबिंब स्पष्ट दिसते. आज त्यांच्या चौथ्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे योगदान आठवताना, त्यांच्या लेखणीने लोकांचे जीवन, विचार आणि जीवनपद्धती बदलण्याचा घेतलेला प्रयत्न आठवतो. त्यांनी कवितेला आंदोलनाचं रूप दिलं, आणि जनमानसाला जागं केलं. प्रबोधनकार लोककवी हरेंद्र जाधव यांना विनम्र अभिवादन!

**-प्रा. विजय कोष्टी,**
कवठे महांकाळ (सांगली)
मो. ९४२३८२९११७

# पंडित दीनदयाल उपाध्याय 'एकात्म मानवदर्शन' हीरक महोत्सवाला सुरुवात



**मुंबई :** एकेकाळी भारत विकसनशील देश म्हणून ओळखला जात होता, मात्र आता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात देश विकसित राष्ट्र बनण्याच्या दिशेने घोडदौड करत आहे. या प्रगतीला पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या 'एकात्म मानव दर्शन' तत्त्वज्ञानाचा आधार असल्याचे प्रतिपादन तामिळनाडूचे राज्यपाल थिरू आर. एन. रवी यांनी केले. माटुंगा येथील रुईया महाविद्यालयात पंडित दीनदयाळ उपाध्याय 'एकात्म मानवदर्शन' हीरक महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

राज्यपाल आर. एन. रवी म्हणाले, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडलेल्या 'एकात्म मानव दर्शन' तत्त्वज्ञानात समाजातील शेवटच्या घटकाचा विचार करण्यात आला असून, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखालील या तत्त्वानुसार राज्यकारभार सुरू आहे. अंत्योदय अर्थात शेवटच्या माणसापर्यंत विकासाची गंगा पोहोचवली जात आहे. त्यामुळेच भारताचा विकसनशील देश ते विकसित राष्ट्र पर्यंत प्रवास झाला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात ईशान्य भारतातील परिस्थिती बदलली असून, तिथे शांतता निर्माण झाली असल्याचे त्यांनी सांगितले. अंत्योदयाचा मार्ग अवलंबून त्यांनी ईशान्य भारतात पायाभूत सुविधा निर्माण करून खऱ्या अर्थाने भारताला जोडण्याचे काम केले असल्याचेही त्यांनी सांगितले.

केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरण रिजिजू यांच्या प्रमुख उपस्थितीत पंडित दीनदयाळ उपाध्याय 'एकात्म मानवदर्शन' हीरक महोत्सवाला सुरुवात झाली. रिजिजू यावेळी म्हणाले की, याच रुईया महाविद्यालयात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी साठ वर्षांपूर्वी 'एकात्म मानव दर्शन' तत्त्वज्ञान जनतेपुढे मांडले. या ऐतिहासिक वास्तूत पुन्हा पंडितजींच्या विचारांना आत्मसात करताना मी स्वत:ला भाग्यशाली समजतो. पंडितजींचे विचार भारताला शक्तिशाली राष्ट्र म्हणून जगात ओळख देत असल्याचे केंद्रीय मंत्री रिजिजू यांनी सांगितले.

## थोडक्यात...

### अर्धापूरात ४६ सरपंचपदांची उद्या आरक्षण सोडत

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील ४६ ग्राम पंचायतीसाठी दि.२५ शुक्रवारी रोजी तहसील कार्यालयात सरपंच पदासाठी आरक्षण सोडत होणार आहे. सरपंच पदाच्या आरक्षणाकडे तालुक्यातील गाव पुढाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

अर्धापूर तालुक्यात ४६ ग्रामपंचायती पैकी तब्बल २३ ग्रामपंचायती महिला सरपंच असणार आहेत. तर अनुसूचित जाती ८ (महिला राखीव ४), अनुसूचित जमाती २ (महिला राखीव १), ना.मा.प्र १२ (महिला राखीव ६), खुला प्रवर्ग २४ ( महिला राखीव १२) या प्रमाणे आरक्षण सोडत होणार आहे. गावगाड्यातील सरपंच पदाची निवडणुक पहिल्यांदा थेट जनतेतून होत असल्यामुळे अनेक राजकीय पक्षांचे पदाधिकारी वाटेल ते करुन गावावर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी प्रतिष्ठा पणाला लावणार असल्याचे तयारी वरून दिसत आहे.

### स्वाधार योजनेच्या अर्जातील त्रुटीची पूर्तता करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी नवीन व नुतनीकरण ऑनलाईन अर्ज भरले आहेत अशा विद्यार्थ्यांचे नुतनीकरण अर्ज ऑनलाईन पद्धतीने तपासणी झाली आहेत. ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज अपूर्ण कागदपत्राअभावी त्रुटीत आले आहेत अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे माहिती देण्यात येत आहे. ही शेवटची संधी असून अर्ज त्रुटीत आलेल्या विद्यार्थ्यांनी http://www.syn.mahasamajkalyan.in संकेतस्थळावर भेट देऊन आपल्या अर्जातील त्रुटीची पूर्तता एसएमएस प्राप्त झाल्याच्या २८ एप्रिल २०२५ या कालावधीत कार्यालयास सादर करावयाची आहेत.

# लोहा शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी लिंबोटी धरणातून सुनेगाव तलावात पाणी

## २० कर्मचाऱ्यांची दोन शिफ्टमध्ये ड्युटी, पाणी चोरीवर आळा



**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा शहराला पाणी पुरवठा होणाऱ्या सुनेगाव तलावाने तळ गाठला होता. अजून दीड महिना उन्हाळा बाकी आहे. त्यामुळे शहराला भीषण पाणीटंचाई भासणार अशी परिस्थिती निर्माण झाली. नगर परिषदेच्या प्रशासक उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार यांनी पाणी सोडण्यासाठी पाटबंधारे विभागाशी पत्रव्यवहार केल्यानंतर सोमवारी (दि.२१) लिंबोटी धरणातून सुनेगाव तलावात दीड टिमसी पाणी सोडण्यात आले.

लिंबोटी धरणातून सोडण्यात आलेल्या पाण्याची चोरी होऊ नये, यासाठी नगर पालिकेचे २० कर्मचारी पाणी मार्गावर बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले आहेत. तर सहा कर्मचाऱ्यांना फिरतीवर ठेवण्यात आले आहे.

सुनेगाव तलावातून शहराला पाणी पुरवठा होतो. या तलावातून लगतच्या नऊ गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या योजनांच्या विहिरी आहेत. तसेच हिवाळ्यात रब्बी हंगामात तलावातून पाणीपाळी देण्यात आली होती. त्यामुळे पाणीटंचाईची समस्या उद्भवली.

पाणी टंचाई आराखडा बैठकीत आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी लोहा शहरासाठी पाणी सोडण्याचे निर्देश पाटबंधारे विभागाला दिले होते. तसेच या संदर्भात उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार यांनीही पाटबंधारे विभागाशी पत्रव्यवहार केला होता.

यंदाच्या तुलनेत गतवर्षी लिंबोटी धरणात पाणीसाठा अत्यल्प असूनही पाणीपुरवठा करण्यात आला होता. यंदात लिंबोटी धरणात पाणीसाठी मुबलक आहे. त्यामुळे सोमवारी लिंबोटी धरणातून सुनेगाव तलावात दिड टिमसी पाणी सोडण्यात आले.

एकीकडे शहरातील नागरिक नळाला पाणी आल्या नंतर त्याची बचत करण्या ऐवजी नासाडी अधिकची करत असतात. तर दुसरीकडे शहरवासीयांनी भीषण पाणी टंचाई भासू नये यासाठी मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांनी पाणी मार्गावर कर्मचारी तैनात केले आहेतय स्वतः रखरखत्या उन्हाची पर्वा न करता मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांनी दिवसभर वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन पाहणी केली.

## बारूळ येथील अखंड हरिनाम सप्ताह व सर्वधर्मिय विवाह मेळाव्यात २५ जोडप्यांचे शुभमंगल



**बारूळ (प्रतिनिधी)–** येथील संत श्री नामदेव महाराज मठ संस्थानच्यावतीने सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची २२ एप्रिल रोजी उत्साहात सांगता करण्यात आली. तसेच त्यानंतर आयोजित सर्वधर्मीय विवाह मेळाव्यात तब्बल २५ जोडपे विवाह बंधनात अडकली.

अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता काल्याचे किर्तन ह.भ. प. सोपान महाराज सानप यांच्या कीर्तनाने झाली. यावेळी कंधार, मुखेड तालुका, तेलंगणा येथील भक्तांनी लाभ घेतला. अध्यात्मा बरोबरच सामाजिक परंपरा असलेल्या मठ संस्थान तर्फे २५ नववधूवरांचे विवाह सोहळा उत्साहात संत महात्म्यांच्या उपस्थितीत व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, भाजपचे ॲड. विजय धोंडगे, माधव साठे, प्रा. मनोहर धोंडे, जहीराबादचे खा. बी.बी. पाटील, सतीश पाटील उमरेकर, बालाजी पाटील खतगावकर, बालाजी बंडे, माणिक चोपवाड, मारुती पंढरे, सविता करेवाड, परमेश्वर जाधव, संजय भोसीकर, बाबू सावकार देबडवार, शिवकुमार देशमुख, भाऊसाहेब पाटील कदम, रामचंद्र येईलवाढ, बाबुराव देशमुख, खुशालराव पाटील, देवराव पांडागळे, अभियंता देविदास बसवदे, मंडळ अधिकारी कुऱ्हाडे, दिलीप धोंडगे, शिवराज धोंडगे, सुरेश इटकापल्ले, मनोहर चिखलीकरांसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. एस. एम. सोनटक्के व पद्माकर जाधव यांनी सुरेख सूत्रसंचालन केले.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी २० वर्षाची शिक्षा

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरापासून अवघ्या पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या गावात एका सहा वर्षीय बालिकेवर अत्याचार करणाऱ्या नराधमास येथील प्रमुख जिल्हा न्यायाधीश सुनील वेदपाठक यांनी वीस वर्षाची आणि पंचवीस हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. या प्रकरणाचा युक्तिवाद अतिरिक्त सरकारी वकील मनीकुमारी बतुल्ला (डांगे) यांनी केला.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सहा वर्षीय बालिका २० सप्टेंबर २०२३ रोजी शाळा सुटल्यानंतर आपल्या घरी गेली. त्यानंतर ती गावातीलच राजे छत्रपती गणेश मंडळाकडे खेळण्यासाठी गेली होती. तिथे तिच्या घरी नेहमी येणारा गावातील बालाजी माधव व्हंडे हा तिला भेटला. तिला जवळ बोलावून तुला छोटा गणपती दाखवतो असे म्हणून आपल्या घरात तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. हा प्रकार आपल्या आईला आणि आजीला तिने सांगितला. त्यांनी तात्काळ आपल्या अन्य नातेवाईकांना कळवून पीडित मुलीला घेऊन नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे गाठले. पिडीतेच्या आईच्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात अत्याचार व पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. पीडित बालिकेची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

दरम्यान पोलिसांनी आरोपीला अटक केली. तपासीक अंमलदार पोलीस उपनिरीक्षक स्नेहा पिंपरखेडे यांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाने या प्रकरणात आठ साक्षीदार तपासले. वैद्यकीय अहवाल, पीडित बालिकेचा जबाब, साक्षीदारांचा जबाब आणि सरकारी वकील मनीकुमारी यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायाधीश वेदपाठक यांनी आरोपी बालाजी व्हंडे याला वीस वर्ष व २५ हजार रुपये रोख दंडाची शिक्षा सुनावली.

## नाला सरळीकरण आणि खोलीकरण कामाचे आ. बोंढारकर यांचे हस्ते भूमिपूजन



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील आंबे सांगवी येथील नाला सरळीकरण आणि खोलीकरणाच्या कामाचे भूमिपूजन आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते करण्यात आले. पावसाळ्याच्या अनुषंगाने नाला सरळीकरण आणि खोलीकरणाचे काम अत्यंत महत्वपूर्ण असून यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल असा विश्वास आमदार बोंढारकर यांनी व्यक्त केला आहे.

यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख अशोक मोरे, शहरप्रमुख तुलजेश यादव, शहरप्रमुख सुहास खराणे पाटील, उपतालुकाप्रमुख माऊली मोरे, व्हाईस चेअरमन बालाजी पाटील कौठेकर, नितीन पाटील कदम, चेअरमन सुदाम पाटील उमरेकर, सरपंच दयानंद डूबे, उपसरपंच गणपती कदम, माधव पाटील सावंत, गंगाधर कदम, नितीन कदम, गोविंद औंढे, गोविंद कदम, नामदेव कदम, गणेशराव कोटेकर, शंकर सावंत यांच्यासह गावकरी मंडळी उपस्थिती होती.

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना आणि या भागातील ग्रामस्थांना उथळ आणि वेड्यावाकड्या नाल्यांमुळे पावसाळ्यात पुराच्या पाण्याचा फटका बसला आहे. ही बाब लक्षात घेता नाला खोलीकरण आणि सरळीकरण अत्यावश्यक होते. त्यामुळे आ. बोंढारकर यांच्या पुढाकारातून आंबे सांगवी येथे नाला सरळीकरण आणि खोलीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. अन्य गावातील अशी कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करून घेतली जातील, असा विश्वासही आ. बोंढारकर यांनी व्यक्त केला.

## श्रीमती चंद्रभागा खूनशेट्टे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** हंगरगा बुद्रुक (ता. औराद) येथील ज्येष्ठ महिला श्रीमती चंद्रभागा मारुतीराव खूनशेट्टे यांचे बुधवार दि.२३ एप्रिल रोजी उपचारादरम्यान निधन झाले. मृत्यू समयी त्या ९५ वर्षाच्या होत्या. यांच्या पार्थिवावर हंगरगा बुद्रुक येथे गुरुवार दि.२४ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात सवत, ९ मुली, मुलगा डॉ.राजीव, जावई, नातू, नातसूना असा परिवार आहे. सिमावरतील भागातली प्रसिद्ध उद्योजक मारोतीराव खूनशेट्टे यांच्या त्या पत्नी होत.

## विष पाजून पत्नीला मारण्याचा प्रयत्न; गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** किरकोळ कारणावरून पत्नीला विष पाजून खून करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पती व त्याच्या अन्य नातेवाईकांविरुद्ध किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शनिवार पेठ भागातील विवाहिता रेखा नरसिंग मुंडकर (वय २८) हिला सन २०१५ पासून ते कालपर्यंत सासरी सतत शारीरिक आणि मानसिक त्रास देणे सुरू होते. तरीही तिने तो त्रास सहन करत आपला संसार चालू ठेवला. परंतु तिला ठार मारण्याच्या उद्देशाने धोंडीबा सिद्राम मुंडकर, गजानन सिद्राम मुंडकर आणि नर्सिंग सिद्राम मुंडकर या तिघांनी संगणमत करून किरकोळ कारणावरून तिच्याशी वाद घातला होता.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती शांततेत साजरी करा

## मुदखेडचे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांचे आवाहन



**मुदखेड (प्रतिनिधी)–** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती शांततेत साजरी करा. विविध विधायक उपक्रम राबवा. मिरवणुकीत अडथळा निर्माण होणार नाही व कोणतेही वाद होणार नाहीत याची काळजी घ्यावी, असे आवाहन पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांनी केले.

येथील तहसील कार्यालयाच २२ रोजी आयोजित शांतता कमिटीच्या बैठकीत ते बोलत होते.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी नायब तहसीलदार मारोतराव जगताप, प्रमुख अतिथी रत्नाकर तारू, काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास गोडसे, युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष मुजीब पठाण, मुख्याधिकारी शैलेश फडसे, महावितरणचे सहायक अभियंता शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक बी. आर. कांबळे, नगरपरिषदेचे लिपिक दिलीप पवार, पोलीस पाटील सारिका ताई, व्यंकटेश खानसोळे, अशोक चव्हाण, आदिनाथ ढगे, पंडितराव चव्हाण, दरेगाव वाडी येथील माजी उपसरपंच दिगंबर गव्हाण, दरेगावचे माजी उपसरपंच शुद्धोधन कोलते, उपसरपंच सुनील एडके, माजी उपसरपंच दिगांबर गव्हाणे, मुकेश कांबळे, राजु चौदंते, सुमित सरोदे, कोंडीबा कोलते, बाबु कोलते यांच्यासह शहर व तालुक्यातील भीम जयंती मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीच्या यशस्वीतेसाठी पोलीस विभागाच्या जिल्हा विशेष शाखेचे पोहेका किशोर पाटील यांनी परीश्रम घेतले पत्रकार संजय कोलते यांनी बैठकीचे सूत्रसंचालन केले. तर सहायक पोलीस निरीक्षक बी. आर. कांबळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## सिडकोतील आध्यात्मिक विकास केंद्रात पुण्यतिथी सप्ताह

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सिडकोमधील रामनगर येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रामध्ये श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी सप्ताह दिंडोरी प्रणीत उत्सव अखंड नाम-जप-यज्ञ सप्ताह दि. २० ते २६ एप्रिल दरम्यान आयोजित करण्यात आला आहे.



१९ एप्रिल रोजी ग्राम देवता निमंत्रण, मंडल मांडणी व पूर्व तयारी, सामुहिक गुरुचरित्र वाचन. २० एप्रिल रोजी मंडल स्थापना, अग्नि स्थापना, स्थापित देवता हवन व सकाळी ७.३०औदुंबर प्रदक्षिणा नित्य स्वाहाकार सकाळी ८ भुपाळी आरती. २१ एप्रिल रोजी नित्य स्वाहाकार, श्री गणेश याग व मनोबोध याग सकाळी ८.३०, नित्य स्वाहाकार, चंडी याग सकाळी १०.३० नैवेद्य आरती, २२ मे शुक्रवार नित्यस्वाहाकार, श्री स्वामी याग सकाळी १० ते १२.३० वाजता विशेष याग. २३ एप्रिल रोजी नित्य स्वाहाकार श्रीगिताई याग सायं.६.वा औदुंबर प्रदक्षिणा. २४ रोजी नित्य स्वाहाकार, श्री रुद्र याग व मल्हारी याग सायं ६.३०वा. नैवेद्य आरती. २५ एप्रिल रोजी गिताई याग, रूद्र व मल्हारी याग. २६ एप्रिल रोजी नित्य स्वाहाकार, बली पूर्णाहुती, सत्यदत्त पुजन, महानैवद्य आरतीसायं ७ वाजता. श्री विष्णु सहस्त्र नाम, गिताई व अखंड नाम जप यज्ञ सप्ताह सांगता मनाचे श्लोक वाचन, प्रहर सेवा महिला सकाळी ६ ते रात्री ८ वाजेपर्यंत, पुरुष रात्री ८ ते सकाळी ६ वाजे पर्यंत आयोजित करण्यात आला आहे. या अखंड नाम जप यज्ञ सप्ताहामध्ये ३४४ गुरूचरित्र पारायण महिला पुरुष भाविक बसले आहेत. या सोहळ्याला भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पुण्यतिथी सप्ताहाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# सांगवी प्रभाग ३ व कामठा परिसरातील वीजपुरवठा तातडीने सुरळीत करावा

## शिवसेनेचे कोकाटे, सरपंच पुयड, सिद्धू यांची मागणी



**नांदेड (प्रतिनिधी) –** मागील काही दिवसांपासून सांगवी प्रभाग ३, कामठा, नमस्कार चौक परिसरात विजेचा लंपडाव सुरु आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. या भागातील वीजपुरवठा तात्काळी सुरळीत करावा, अशी मागणी शिवसेना सह संपर्कप्रमुख दर्शनसिंग सिद्धू, सांगवी प्रभागाचे माजी नगरसेवक प्रतिनिधी श्याम कोकाटे, कामठा नगरीचे सरपंच शिवराज पाटील पूयड, शिवसैनिक श्याम वानखेडे यांनी महावितरणचे कार्यकारी अभियंता विनय घनबहादुर यांची भेट घेवून केली आहे.

मागील आठ दिवसांपासून परिसरातील नागरिक हे विजेच्या लपंडावामुळे त्रस्त आहेत. वेळी अवेळी विद्युत पुरवठा खंडित झाल्याने नागरिक वैतागले आहेत. कस्टमर केअर वाले फोन उचलत नाहीत. अधिकारी आज, उद्या अशी वेळ देऊन दिवस काढत आहेत. पण समस्या आहे तशीच आहे. यावेळी शिष्टमंडळाने भेट घेत अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. दोन दिवसांत सर्व समस्या निकाली काढून विद्युत पुरवठा सुरळीत करावा, अन्यथा एकाही कर्मचाऱ्याला विद्युत बिल मागणीसाठी फिरू देणार नाही, असा इशारा देण्यात आला.

यावेळी कार्यकारी अभियंता यांनी ताबडतोब संबंधित अधिकाऱ्याला बोलावून उद्याच्या उद्या काम मार्गी लावा अशा सूचना केल्या.

## वैद्यकीय महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी अनोखी मॉडेल मेकिंग स्पर्धा संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी) –** विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शरीर क्रिया शास्त्र विभागाच्या डॉ. वंदना दुधमल यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या मॉडेल मेकिंग स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत १५ गटांच्या माध्यमातून सुमारे १५० एमबीबीएस प्रथम वर्षांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना अवयवांचा त्रिमितीय आकलनात्मक अभ्यास करण्यास मदत झाली.

विद्यार्थ्यांसाठी विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय विविध व अभिनव उपक्रम राबविण्यात अग्रेसर आहे. त्याचाच एक भाग म्हणून अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शरीर क्रिया शास्त्र विभागातील डॉ. वंदना दुधमल यांच्या पुढाकारातून एमबीबीएस प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी मॉडेल मेकिंग स्पर्धा घेण्यात आली. दि. २८ व २९ मार्च रोजी अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेत १५ गटांच्या माध्यमातून १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेत विद्यार्थ्यांना अवयवांचा त्रिमितीय आकलनात्मक अभ्यास करण्याची संधी मिळाली.

ग्रामीण पॉलिटेक्नीकचे उपप्राचार्य डॉ. संजय देऊळगावकर, स्वा.रा.ती.म विद्यापीठातील माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. राजेंद्र गोणारकर, सुक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमूख डॉ. संजय मोरे, स्त्रीरोग तज्ज्ञ अनिल साखरे, शरीर रचना विभागप्रमूख डॉ. वैशाली इनामदार यांनी स्पर्धेचे परीक्षण करून निकाल जाहीर केला. शेवटी विजेत्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

## महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाची कार्यकारिणी जाहीर



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाची राज्याध्यक्ष केशवराव जाधव यांच्या उपस्थितीत दि. १८ रोजी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. सल्लागारपदी निळकंठ चोंडे यांची तर उपाध्यक्षपदी व्यंकट कल्याणपाड यांची निवड करण्यात आली.

उर्वरित नुतन कार्यकारिणीत जिल्हाध्यक्ष शंकर हासगुळे, कार्याध्यक्ष संजय नक्कावार, सरचिटणीस रमेश घुमलवाड, कोषाध्यक्ष बालाजी चंदावाड, सचिव भाऊसाहेब वडजे, वरिष्ठ उपाध्यक्ष संजीवकुमार होरे, संपर्कप्रमुख दिलीप पांचाळ, शिवकुमार पाटील, प्रसिद्धप्रमुख संग्राम झुडपे, रघुनाथ सोनटक्के, शिवशंकर रॅपनवाड यांची तर सल्लागार म्हणून शिवाजी मुंडकर, सचिन पाटील, अविनाश कोल्हे, ओमप्रकाश बावगे, जयवंत देशमुख, नारायण गॅदलवाड, उपाध्यक्ष मोतीपाशा बेग, भीमराव बैलके, शंकर बेंद्रे, संजय वाघमारे, अशोक अंभोरे, संजय खंडागळे, विठ्ठल लांडगे, लक्ष्मीकांत पंतुलवार, कैलास काळेवाड, शेख आलीम, मंगेश कोंडलवाडे, जिल्हा संघटक रामदास ढाले, विजय कुऱ्हाडे, नवीन आरगुलवार, राजेश्वर भंडारे, सुभाष चव्हाण, केरबा सोनमनकर, माधव तांदळे, शंकर काठेवाड, विजय येवतीकर, सहसचिव राहुल भद्रे, मालू जाधव, हनुमंत देवदे, बालाजी बासटवार, हनुमंत कानगुलवार, यादव कानगुले, नागनाथ राजुरे, शिवप्रसाद स्वामी, महिला प्रतिनिधी प्रयागताई बिचकुंदे, अनुपमा बन, सुलक्षणा राजे, आरती घुले, ज्योती कुलकर्णी, सुनीता मुकनपल्ले, आशा रूद्रावार यांची निवड करण्यात आली.

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

## चेहऱ्यावरील काळे डाग, टॅनिंगवर किचनमध्ये उपाय

**आज काल टॅनिंगची समस्या खूप सामान्य आहे. थोडावेळ उन्हात उभे राहिल्यास त्वचा काळी पडू लागते. म्हणूनच घराबाहेर पडताना शरीर पूर्णपणे झाकण्याचा सल्ला दिला जातो. सन क्रीम आणि टॅनिंग रिमूव्हर क्रीमचे अनेक मोठे ब्रँड बाजारात उपलब्ध आहेत. पण या गोष्टींची किंमत जास्त असल्याने सर्वांनाच या गोष्टी परवडतील असे नाही. अनेकजण हा फालतू खर्च समजूनही खरेदी करत नाहीत. अशा वेळी सन टॅन दूर करण्यासाठी आम्ही तुम्हाला असे उपाय सांगत आहोत, जे तुम्ही तुमच्या स्वयंपाकघरात ठेवलेल्या वस्तूंनीच करू शकता.**

- हळद आणि बेसन पॅक : हळद आणि बेसनाच्या पॅकने घरच्या घरी त्वचेची टॅनिंग सहज काढता येते. यासाठी अर्धा चमचा हळद, एक चमचा गुलाबपाणी आणि दूध दोन चमचे बेसन मिसळून



घ्या. आता टॅनिंग त्वचेला पाण्याने चांगले धुवा आणि पेस्ट लावा. १० मिनिटांनंतर त्वचा धुवून स्वच्छ करा. त्वचेचा रंग परत येईपर्यंत तुम्ही हा पॅक दर दुसऱ्या दिवशी लावू शकता.
- सन टॅन घालवण्यासाठी बटाट्याचा वापर : त्वचेवरील सन टॅन दूर करण्यासाठी बटाटा हा एक प्रभावी घरगुती उपाय मानला जातो. पण त्यात कॅटेकोलेज नावाचे एंजाइम असते, जे त्वचेचा रंग उजळण्यास मदत करते. त्याबद्दलचा सर्वात चांगला भाग म्हणजे तुम्हाला ते कशातही मिसळण्याची गरज नाही. टॅनिंग दूर करण्यासाठी, फक्त तीन कच्च्या बटाट्याची पेस्ट तयार करा आणि त्वचेवर लावा. तुम्ही अर्धा कापलेला बटाटा देखील वापरू शकता.
- दही आणि हळद मिसळा : हात, पाय, मान किंवा चेहऱ्यावरील त्वचेवरील डाग दूर करण्यासाठी तुम्ही दही आणि हळद यांचे मिश्रण लावू शकता. हे दह्यामध्ये असलेले प्रोबायोटिक्स आणि हळदीतील दाहक-विरोधी गुणधर्मांमुळे आहे, जे त्वचेची चमक वाढवते आणि मुक्त रॅडिकल्सपासून संरक्षण करते. ही पेस्ट बनवण्यासाठी तुम्हाला फक्त एक वाटी थंड दही आणि चिमूटभर हळद लागेल. आंघोळ करण्यापूर्वी ते त्वचेवर लावा आणि कमीतकमी २० मिनिटे सोडा. चांगल्या परिणामांसाठी ही पेस्ट किमान दोन आठवडे दररोज वापरा.
- कच्च्या दुधाने आराम मिळेल : टॅनिंग दूर करण्यासाठी कच्चे दूध खूप प्रभावी आहे. त्यात हळद आणि लिंबाचा रस घालून तुम्ही तुमचा नैसर्गिक टॅन रिमूव्हर तयार करू शकता. टॅन केलेल्या भागावर मसाज करा आणि पेस्ट सुकल्यानंतर धुवा. तुम्हाला दिसेल की त्वचेची चमक परत येत आहे.
- टोमॅटो टॅनिंग लवकर दूर करेल : टोमॅटो हे लाइकोपीन समृद्ध नैसर्गिक सनस्क्रीन आहे. हे अँटीऑक्सिडंट्ससह चॉक-ए-ब्लॉक आहे, जे मुक्त रॅडिकल्सच्या नुकसानाशी लढा देते. अशा परिस्थितीत, सूर्यप्रकाशित त्वचेच्या उपचारांसाठी हा एक उत्तम पर्याय आहे. बाहेरून घरी येताच ताबडतोब कापून काळ्या त्वचेवर लावा आणि २० मिनिटे तसेच राहू द्या.

## शॅम्पूनंतर केस आणखीनच गळतात?

**केसांमुळे आपले व्यक्तीमत्व अधिक खुलते. आपले शरीर जितके निरोगी असेल तितके केससुद्धा छान राहतात. म्हणजेच केसांचे आरोग्य आपण किती पौष्टिक आहार घेतो यावर अवलंबून असते.**

केस गळू नयेत, मऊ आणि दाट राहावे यासाठी वेगवेगळे उपाय केले जातात. पण प्रत्येक वेळी त्यातून समाधान मिळतेच असे नाही. केसगळती या समस्येला सर्वजण त्रासलेले दिसून येतात. त्यातही शॅम्पूने केस धुतल्यानंतर केस अधिक गळतात, असा अनुभव काहीजणांना आला असेल. केसांची काळजी उत्तमरीत्या घेण्यासाठी प्रत्येक जण प्रयत्न करत असतो. केस जास्त गळायला लागले की सगळेच चिंताग्रस्त होतात. कारण आपण आकर्षक दिसावं असं प्रत्येकालाच वाटत असते. त्यामुळे यावर काय करता येईल यासाठी वेगवेगळे प्रोडक्ट वापरले जातात. त्यातच केस धुण्यासाठी महागड्या शॅम्पूची निवड केली जाते. पण शॅम्पूने केस धुतल्यानंतर कधी कधी केस जास्त गळतात. याचा अनुभव बऱ्याच जणांनी घेतला असेल. याबद्दल तज्ज्ञांचे काय मत आहे जाणून घेऊया. तज्ज्ञांच्या मते शॅम्पू लावल्यानंतर होणारी केसगळती थांबवण्यासाठी केसांना हानिकारक नसणारा, सल्फेट फ्री शॅम्पू वापरावा. जेणेकरून तुमचे केस आणि टाळू कोरडे होणार नाहीत. शॅम्पू लावताना टाळूवर खूप जोरात मसाज करू नये. त्यामुळे केस अधिक गळण्याची शक्यता असते. यावरील सोपा पर्याय म्हणजे पुरेसा शॅम्पू हातात घेऊन त्याचा फेस बनवा आणि तो हळूवारपणे टाळूवर लावा. टाळूवर जास्त जोर देऊन शॅम्पू लावू नका. केस धुण्यासाठी नेहमी थंड किंवा कोमट पाण्याचा वापर करा. केस धुताना गुंता होण्याची शक्यता असते. ज्यामुळे केस गळू शकतात. म्हणून केस हळुवारपणे बोटांच्या साहाय्याने धुवा. शॅम्पू लावण्याची ही पद्धत नक्कीच उपयुक्त ठरू शकते.

## शॅम्पू करण्याच्या ५ टिप्स...

**केसांची काळजी घेण्यासाठी योग्यप्रकारे काही गोष्टी पाळल्या पाहिजेत. कधी कधी केसांची काळजी घेण्याचा कंटाळा येतो. पण काही गोष्टी न चुकता केल्यास केस छान राहण्यास मदत होते. बहुतेक लोक आठवड्यातून एकदा तरी आपले केस धुतात, परंतु अनेकांना शॅम्पू नक्की कसा वापरायचा याचा योग्य मार्ग माहित नाही. तज्ज्ञ डॉक्टर सांगतात, केसांची काळजी घेण्याच्या दिनक्रमात शॅम्पूइंग ही सर्वात महत्वाची पायरी आहे, म्हणून काही तथ्ये जाणून घेणे आणि शॅम्पूइंग योग्य कसे करावे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.**

### पाच शॅम्पूइंग टिप्स

1. शॅम्पू फक्त टाळू स्वच्छ करण्यासाठी आहे : शॅम्पू फक्त टाळूसाठी आहे. उत्पादनाच्या तीव्रतेनुसार शॅम्पू ३० सेकंद किंवा त्यापेक्षा जास्त काळ एकट्या टाळूमध्ये मालिश केले पाहिजे. लक्षात ठेवा की समान वितरणासाठी आणि चांगले लॅथरिंगसाठी, आपले केस ओले असणे आवश्यक आहे.
2. शॅम्पू कमी प्रमाणात वापरला पाहिजे : आपण कमी प्रमाणात शॅम्पू न वापरल्यास केस जास्त कोरडे होऊ शकते. जास्त शॅम्पू लावल्याने तुमचे केस खराब होऊ शकतात. तुमचे केस कितीही लांब असले तरीही, अगदी थोडासा शॅम्पू लावावा.
3. शॅम्पूचा वापर किती वेळा करावा? : आपल्यापैकी बरेचजण आठवड्यातून एकदा किंवा दोनदा शॅम्पू लावतात. परंतु तुमच्या केसांच्या पोत आणि टाळूच्या स्वभावावर हे अवलंबून असते की शॅम्पूचा वापर किती वेळा करावा? काहींना दररोज शॅम्पू करण्याची आवश्यकता असू शकते आणि अशा परिस्थितीत सौम्य शॅम्पू वापरणे आवश्यक आहे. काहींना टाळूला नियमित शॅम्पू करण्याची आवश्यकता नसली तरी, पोत आणि वाढीसाठी वारंवारता कमी करणे महत्वाचे आहे. शॅम्पू करताना तुम्हाला काही समस्या येत असल्यास त्वचारोगतज्ज्ञांचा सल्ला घेणे तुम्हाला चांगले परिणाम मिळवण्यासाठी मदत करू शकते.
4. कोणताही शॅम्पू उत्तम नाही : जे दुसऱ्याला बरोबर वाटेल तोच शॅम्पू तुमच्यासाठी योग्य आहे असं असू शकत नाही. प्रत्येकाचे केस वेगळे असतात. आपल्या केसांना त्याच्या प्रकृतीनुसार शॅम्पू शोधणे आवश्यक आहे. त्वचारोगतज्ज्ञ तुमच्या टाळूची स्थिती आणि केसांच्या पोत याबाबत मार्गदर्शन करू शकतात. काहींचे कोरडे टाळू आणि काही तेलकट असू शकतात, म्हणून योग्य शॅम्पू निवडणे गरजेचे असते.
5. ओल्या केसांना टॉवेलने बांधू नका : एकदा आपण आपले केस धुतले की नीट सुकवलेही पाहिजे. आपले केस घट्ट टॉवेलने बांधल्याने त्याचं नुकसान होऊ शकते. आपले केस सुकवण्याचा एक उत्तम मार्ग म्हणजे कॉटन टॉवेल किंवा कॉटन टी-शर्ट वापरणे. त्याच्या मऊ पोतामुळे केसांचे कोणतेही नुकसान होणार नाही.





**केस लांबसडक आणि दाट असावेत असे प्रत्येक महिलेचे स्वप्न असते. पण जर केसांची वाढ थांबली असेल तर त्यावर उपाय काय हा प्रश्नसुद्धा प्रत्येक महिलेच्या मनात असतो. बाजारातील केमिकलयुक्त शॅम्पूंच्या वापरामुळे केस गळणे, राठ होणे आणि निर्जिव होण्याची समस्या वाढते. अशा परिस्थितीत घरच्या घरी नैसर्गिक घटकांपासून शॅम्पू तयार करून केसांचे आरोग्य सुधारले जाऊ शकते. आम्ही तुम्हाला राइस शॅम्पू बनवण्याची आणि त्याचा योग्य प्रकारे वापर करण्याची पद्धत सांगणार आहोत, ज्यामुळे तुमचे केस लांब, दाट आणि चमकदार होतील. आपण वापरत असलेल्या रासायनिक शॅम्पूमध्ये सोडियम लॉरील सल्फेट आणि पॅराबेन्ससारखे हानिकारक घटक असतात. जे आपल्या केसांना हानी पोहोचवतात यात शंका नाही. याशिवाय, यामुळे केस गळणे आणि अकाली पांढरे होण्याची समस्यादेखील वाढते. त्यामुळे असा शॅम्पू घरीच बनवणे महत्त्वाचे आहे, ज्याचा वापर केल्यावर एकही केस तुटत नाही आणि वाढही जलद होते. चला जाणून घेऊया असा प्रभावी शॅम्पू कसा बनवायचा...**

## तांदळाच्या शॅम्पूमुळे भराभरा वाढतील केस

### राइस शॅम्पू तयार करण्यासाठी साहित्य

- तांदूळ १ कप, मेथी २ चमचे, रिठा शिककाई १ कप, पाणी ४ ग्लास, फ्लॅक्स सीड्स (जवस) २ चमचे.
- राइस शॅम्पू बनवण्याची प्रक्रिया : एका भांड्यात १ कप रीठा, २ चमचे मेथी दाणे, २ चमचे फ्लॅक्स सीड्स आणि २ ग्लास पाणी घालून संपूर्ण रात्री भिजवून ठेवा. अगदी सकाळी भिजवलेले तांदूळ मिक्सरमध्ये बारीक करून, पाणी वेगळे काढा. एका पॅनमध्ये तांदळाचे पाणी, रीठा, मेथी आणि फ्लॅक्स सीड्स एकत्र घालून १५-२० मिनिटे उकळा. उकळल्यानंतर, मिश्रणातील ठोस घटक मिक्सरमध्ये बारीक करून पेस्ट बनवा. यातील रीठ्याची बीजे काढून टाकायला विसरू नका. एका स्वच्छ सुती कपड्याने तयार केलेले पेस्ट गाळा आणि त्यात तांदळाच्या पाण्याचे मिश्रण नीट मिसळा. अशा प्रकारे तुमचा नैसर्गिक राइस शॅम्पू तयार होईल.

### राइस शॅम्पूचे फायदे

- केसांची वाढ सुधारते : राइस शॅम्पूमध्ये असलेल्या नैसर्गिक घटकांमुळे केस लवकर वाढतात आणि दाट होतात.
- केस गळती रोखली जाते : रिठा आणि मेथीच्या गुणधर्मांमुळे केसांचा तुटण्याचा आणि गळण्याचा त्रास कमी होतो.
- केसांचे पोषण : फ्लॅक्स सीड्स आणि तांदळाचे पाणी केसांना नैसर्गिक पोषण देतात, ज्यामुळे ते मऊ, चमकदार, आणि सशक्त होतात.
- डॅमेज केस दुरुस्त होतात : डॅमेज झालेल्या केसांना हा शॅम्पू योग्य प्रकारे दुरुस्त करून त्यांचे आरोग्य सुधारतो.
- केमिकल मुक्त समाधान : यात कोणतेही हानिकारक केमिकल्स नसल्यामुळे केसांचे दीर्घकालीन आरोग्य टिकून राहते.

### राइस शॅम्पू वापरण्याचे महत्त्वाचे मुद्दे

बऱ्याच लोकांना जास्त फेस असलेले शॅम्पू वापरणे आवडते. त्यामुळे जास्त फेस निर्माण करण्यासाठी रिठ्याचे प्रमाण वाढवता येईल. शॅम्पू केल्यानंतर तांदळाच्या पाण्याने केस स्वच्छ धुतल्यास फ्रीझीनेस कमी होतो. शॅम्पू लवकर खराब होऊ नये म्हणून तो फ्रिजमध्ये ठेवावा.

घरी बनवलेला राइस शॅम्पू हा केमिकलयुक्त शॅम्पूंच्या तुलनेत अधिक फायदेशीर आणि सुरक्षित आहे. याचा नियमित वापर केल्यास केस दाट, लांबसडक, आणि चमकदार बनतील. नैसर्गिक घटकांपासून बनवलेला हा उपाय तुमच्या केसांच्या आरोग्यासाठी प्रभावी ठरेल.



## शॅम्पू करूनही केस तेलकट होतात?

**जेव्हा केस चिकट आणि तेलकट असतात, तेव्हा ते तुटण्याची शक्यता देखील वाढते. केस लवकर तेलकट होण्याचे कारण म्हणजे आपल्या टाळूवर होणारं ऑइल प्रोडक्शन. यामुळे केस चिकटलेले दिसतात आणि स्पर्श केल्यावर चिकट वाटतात. अशा परिस्थितीत केस रोज धुणे हा उपाय नाही. कारण जास्त शॅम्पू केल्याने केस कमकुवत आणि कोरडे होतात. केसांना तेलकट होण्यापासून रोखण्यासाठी काही घरगुती टिप्स तुमच्या उपयोगाचे ठरू शकतात...**

- ॲपल सायडर व्हिनेगर : जर तुमच्या टाळूवर जास्त तेल जमा होत असेल तर ते थांबवण्यासाठी ॲपल सायडर व्हिनेगर खूप प्रभावी ठरतं. यामध्ये असलेले ॲसिटिक ॲसिड स्कॅल्पची पीएच पातळी संतुलित करते. ज्यामुळे केस लवकर तेलकट होत नाहीत. तुम्ही एक कप पाण्यात दोन ते तीन चमचे ॲपल सायडर व्हिनेगर मिसळा आणि शॅम्पू केल्यानंतर केसांना लावा. साधारण अर्ध्या तासानंतर केस स्वच्छ पाण्याने धुवा. आठवड्यातून दोनदा असे केल्याने तेलकट केसांची समस्या दूर होते.
- मुलतानी माती : मुलतानी माती लावल्याने आपल्या डोक्यातील रक्ताभिसरण योग्य प्रकारे होते. ज्यामुळे केसही मजबूत होतात. मुलतानी मातीमध्ये असलेले गुणधर्म देखील टाळूचे पीएच संतुलन सुधारतात. ज्यामुळे केस तेलकट आणि चिकट होत नाहीत. यासाठी तुम्ही तीन चमचे मुलतानी माती थोड्या प्रमाणात पाण्यात घेऊन त्याची हलकी जाड पेस्ट बनवा. आता ही पेस्ट केसांच्या मुळांवर लावा आणि सुमारे २० मिनिटे राहू द्या. केस धुण्यासाठी कोमट पाण्याचा वापर करा. आठवड्यातून एकदा हा उपाय करा.
- पुदिन्याची पाने : आपल्या टाळूमध्ये तेल जमा होण्यापासून रोखण्यासाठी पुदिना प्रभावी असल्याचे मानले जाते. यासाठी तुम्ही दोन ग्लास पाण्यात सुमारे २० पुदिन्याची पाने टाका आणि २० मिनिटे उकळा. त्यानंतर त्या पाण्यात शॅम्पू मिसळा आणि त्या पाण्याने केस धुवा.
- कंडिशनरचाही होतो फायदा : केस लवकर तेलकट होत असतील तर यासाठी केसांमध्ये कंडिशनर वापरायला विसरू नका. प्रत्येक वेळी शॅम्पू करताना केसांना कंडिशनर वापरा. यामुळे केस तुटत नाही आणि त्यांना चमक देते. केस लवकर तेलकट होत नाहीत.

## हेअरफॉल रोखणारा नैसर्गिक शॅम्पू

**केस गळती ही अशी समस्या आहे जी सर्वसाधारणपणे प्रत्येक वयोगटातील लोकांना भेडसावते. बाजारात उपलब्ध असलेल्या अनेक रासायनिक शॅम्पूंपेक्षा नैसर्गिक आणि घरगुती उपाय अधिक सुरक्षित आणि प्रभावी असतात. नैसर्गिक घटकांचा वापर करून तयार केलेले शॅम्पू केसांच्या मुळांना मजबूती देऊन केसांची गुणवत्ता सुधारतात. आज आम्ही तुम्हाला अशाच एका हेअरफॉल रोखणाऱ्या शॅम्पूबद्दल सांगणार आहोत. जो तुम्ही घरच्या घरी बनवू शकता. कांदा, तांदूळ, लवंगा, तमालपत्र आणि पाणी या पाच घटकांचा उपयोग करून तयार केलेला हा शॅम्पू केस गळती विरोधी गुणधर्म असणारा आहे. या शॅम्पूची तयारी कशी करावी, कसा वापरावा आणि त्याचे फायदे काय आहेत हे जाणून घेऊया...**

### शॅम्पू तयार करण्याची पद्धत

कांदा, तांदूळ, लवंगा, तमालपत्र आणि पाणी वापरून शॅम्पू तयार करण्याची प्रक्रिया सोपी आहे. त्यासाठी एका मोठ्या भांड्यात पाणी घेऊन त्यात एक मोठा कांदा चिरून टाका. आता तांदूळ, लवंग आणि तमालपत्र घालून सुमारे दहा मिनिटे हे मिश्रण शिजवा. दहा मिनिटे हे मिश्रण झाकून थंड होऊ द्यावे. यामुळे होईल काय तर कांदा, लवंग, तमालपत्र हे सर्व घटक पाण्यात विरघळतील. आता हे पाणी गाळून घ्या. नंतर मिश्रणात एक चमचा कॉफी पावडर घाला. चांगले मिक्स करा आणि बेबी शॅम्पूमध्ये मिक्स करा. आता आठवड्यातून दोन दिवस या खास शॅम्पूने केस धुवा.

### शॅम्पू कसा लावायचा?

शॅम्पू लावण्यापूर्वी केस ओले करा. हाताने किंवा ब्रशने शॅम्पू थोडासा घ्या आणि केसांच्या मुळांपासून टोकापर्यंत लावा. हलक्या हाताने केसांना मसाज करा. जेणेकरून शॅम्पू त्वचेवर आणि केसांवर समान रीतीने लागेल. साधारण ५-१० मिनिटे मसाज केल्यानंतर केस स्वच्छ पाण्याने धुवा. या शॅम्पूचा वापर आठवड्यातून दोनदा करा. नियमित वापराने तुम्हाला त्याचे फायदे लवकरच दिसू लागतील.

- कांद्याचे फायदे : कांद्यात सल्फर असते, जे केसांच्या वाढीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. सल्फर केसांच्या मुळांना पोषण देऊन त्यांची मजबूती वाढवते. कांद्याचा रस केसांच्या त्वचेत रक्ताभिसरण वाढवतो. ज्यामुळे केसांची मुळे मजबूत होतात. तसेच, कांद्याचा रस अँटीबॅक्टेरियल आणि अँटीफंगल गुणधर्म असतो. ज्यामुळे केसांच्या त्वचेवरील संसर्ग कमी होतो. त्यामुळे केस गळती रोखण्यासाठी कांद्याचा वापर उपयुक्त ठरतो.
- तांदुळाचे फायदे : तांदुळाच्या पाण्यात इनोसिटोल नावाचे घटक असतात, जे केसांच्या नुकसानग्रस्त भागांची दुरुस्ती करतात. तांदुळाचे पाणी केसांच्या चमक वाढवते आणि त्यांना मऊ बनवते. तांदुळाचे पाणी केसांच्या मुळांना पोषण देते आणि त्यांना मजबूत बनवते. नियमित वापर केल्यास केस गळती कमी होते आणि केसांची गुणवत्ता सुधारते. तांदुळाच्या पाण्यातील नैसर्गिक गुणधर्म केसांची मुळे मजबूत करण्यास मदत करतात.



- लवंग आणि तमालपत्राचे फायदे : लवंगा आणि तमालपत्रामध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात, जे केसांच्या मुळांना संरक्षण देतात. लवंगांमध्ये यूजेनॉल नावाचे तेल असते, जे केसांच्या वाढीसाठी उपयुक्त आहे. तमालपत्रामध्ये अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात, जे केसांच्या त्वचेवर होणारे संक्रमण रोखतात. यामुळे केसांची मुळे मजबूत होतात आणि केस गळती कमी होते. लवंग आणि तमालपत्राचा नियमित वापर केल्यास केसांची गुणवत्ता सुधारते.

# भारत विकसित राष्ट्र होण्याच्या प्रक्रियेत ‘एकात्म मानवदर्शन’चा आधार –राज्यपाल रवी

## पंडित दीनदयाळ उपाध्याय ‘एकात्म मानवदर्शन’ हीरक महोत्सवाला सुरुवात



**मुंबई (प्रतिनिधी)–** एकेकाळी भारत विकसनशील देश म्हणून ओळखला जात होता, मात्र आता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश विकसित राष्ट्र बनण्याच्या दिशेने घोडदौड करत आहे. या प्रगतीला पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या 'एकात्म मानव दर्शन' तत्वज्ञानाचा आधार असल्याचे प्रतिपादन तामिळनाडूचे राज्यपाल थिरु आर. एन. रवी यांनी केले. माटुंगा येथील रुईया महाविद्यालयात पंडित दीनदयाळ उपाध्याय 'एकात्म मानवदर्शन' हीरक महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

राज्यपाल आर. एन. रवी म्हणाले, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडलेल्या 'एकात्म मानव दर्शन' तत्वज्ञानात समाजातील शेवटच्या घटकाचा विचार करण्यात आला असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील या तत्वानुसार राज्यकारभार सुरू आहे. अंत्योदय अर्थात शेवटच्या माणसापर्यंत विकासाची गंगा पोहोचवली जात आहे. त्यामुळेच भारताचा विकसनशील देश ते विकसित राष्ट्र पर्यंत प्रवास झाला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात ईशान्य भारतातील परिस्थिती बदलली असून तिथे शांतता निर्माण झाली असल्याचे त्यांनी सांगितले. अंत्योदयाचा मार्ग अवलंबून त्यांनी ईशान्य भारतात पायाभूत सुविधा निर्माण करून खऱ्या अर्थाने भारताला जोडण्याचे काम केले असल्याचेही त्यांनी सांगितले.

केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरण रिजिजू यांच्या प्रमुख उपस्थितीत पंडित दीनदयाळ उपाध्याय 'एकात्म मानवदर्शन' हीरक महोत्सवाला सुरुवात झाली. रिजिजू यावेळी म्हणाले की, याच रुईया महाविद्यालयात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी साठ वर्षापूर्वी ' एकात्म मानव दर्शन ' तत्वज्ञान जनतेपुढे मांडले. या ऐतिहासिक वास्तूत पुन्हा पंडितजींच्या विचारांना आत्मसात करताना मी स्वत:ला भाग्यशाली समजतो. पंडितजींचे विचार भारताला शक्तिशाली राष्ट्र म्हणून जगात ओळख देत असल्याचे केंद्रीय मंत्री श्री. रिजिजू यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाच्या पंडित दीनदयाळ 'एकात्म मानवदर्शन' हीरक महोत्सव समितीचे अध्यक्ष आणि कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारात राष्ट्रप्रेमासह, संपूर्ण विश्वातील मानवाच्या सर्वांगीण विकासाचे मर्म जपले गेले आहे. त्यांच्या विचारांचा खजिना जनतेसमोर उघडताना अत्यानंद होत आहे.

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी ऐतिहासिक सोहळा आयोजित केल्याबद्दल कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांचे कौतुक केले. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या तपस्येतून देशाला दिशा देणारे विचार मिळाले असून सर्वांनी त्याचा अंगिकार केला पाहिजे.

पंडितजींच्या एकात्म मानव दर्शनाच्या हीरक महोत्सवानिमित्त भारतीय टपाल खात्याने विशेष टपाल कव्हर तयार केले असून राज्यपाल रवी यांच्या हस्ते यावेळी त्याचे प्रकाशन करण्यात आले. एकात्म मानव दर्शन या हीरक महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात पंडित दीनदयाळ उपाध्याय संशोधन संस्थेचे अध्यक्ष अतुल जैन, शिक्षण प्रसारक मंडळीचे अध्यक्ष एस.के जैन, पोस्ट मास्तर जनरल अमिताभ सिंग तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुका कायदेशीर तरतुदीनुसारच –भारत निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकानंतर मतदार यादी व मतदानप्रक्रियेवर करण्यात येत असलेल्या आरोपांना भारत निवडणूक आयोगाने उत्तर दिले आहे. आयोगाच्या स्पष्टीकरणानुसार, निवडणूक प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची त्रुटी नसून, सर्व कायदेशीर तरतुदींनुसारच निवडणुका पार पडल्या आहेत.

आयोगाच्या माहितीनुसार, महाराष्ट्रात ६ कोटी ४० लाख ८७ हजार ५८८ मतदारांनी मतदान प्रक्रियेत सहभाग घेतला. सकाळी ७ ते संध्याकाळी ६ या वेळेत दर तासाला सरासरी ५८ लाख मतदारांनी मतदान केले. तथापि, शेवटच्या दोन तासांत अपेक्षित ११६ लाखांच्या तुलनेत केवळ ६५ लाख मतदारांनी मतदान केले, हे लक्षवेधी असले तरी त्यावरून कोणत्याही गैरप्रकाराचा निष्कर्ष काढता येत नाही, असे आयोगाने स्पष्ट केले.

प्रत्येक मतदान केंद्रावर उमेदवार व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत मतदान प्रक्रिया पार पडली. काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांकडून मतदानानंतर कोणतीही तक्रार अधिकृतपणे निवडणूक निर्णय अधिकारी किंवा निरीक्षकांकडे नोंदवण्यात आलेली नाही.

मतदार यादी संदर्भात आयोगाने सांगितले की, १९५० च्या लोकप्रतिनिधी अधिनियम व १९६० च्या मतदार नोंदणी नियमांनुसार तयार केली जाते. विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम दरवर्षी राबवला जातो आणि अंतिम यादी सर्व पक्षांना उपलब्ध यादी करून दिली जाते.

याशिवाय, अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर केवळ ९० अपीले करण्यात आली, जी एकूण मतदार संख्येच्या तुलनेत अत्यल्प आहेत. विशेष म्हणजे काँग्रेसकडूनही कोणतीही मोठी तक्रार नोंदवलेली नाही.

मतदान प्रक्रियेत १ लाखांहून अधिक मतदान केंद्रांवर ९७,३२५ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) व सर्व पक्षांकडून १,०३,७२७मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) नेमले गेले होते. यामध्ये काँग्रेसच्या २७,०९९ बीएलएचा समावेश होता. त्यामुळे मतदार यादी संदर्भातील आरोप पूर्णपणे निराधार असून कायद्याचा अवमान करणारे असल्याचे आयोगाने स्पष्ट केले.

२४ डिसेंबर,२०२४ रोजी निवडणूक आयोगाने काँग्रेसला लेखी उत्तर दिले असून, ही माहिती आयोगाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे. तरीही पुन्हा पुन्हा असे आरोप करून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करणे अयोग्य असल्याचे आयोगाने म्हटले आहे.

# मराठवाड्यात तीन महिन्यात २६९ शेतकऱ्यांनी संपवलं जीवन

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) –** मराठवाड्यात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण थांबण्याचे नाव घेत नाही. यंदाच्या उन्हाळ्यात म्हणजेच १ जानेवारी ते ३१ मार्च दरम्यान, विभागात एकूण २६९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. याचा अर्थ दररोज सरासरी तीन शेतकरी आत्महत्या करत आहेत. मार्च महिन्यात सर्वाधिक १०६ शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली आहे.

या आत्महत्यांमागे मुख्यत्वे करून कर्जबाजारीपणा, शेतीचा वाढता खर्च, शेतमालाला मिळणारा अल्पभाव, नापिकी, खाजगी सावकारांकडून घेतलेले कर्ज, तसेच अतिवृष्टीमुळे शेतीपिकांचे झालेले नुकसान ही प्रमुख कारणे आहेत. त्यामुळे अनेक शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत असल्याचे बोलले जात आहे.

शासनाने शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी काही उपाययोजना केल्या असल्या तरी त्याचा फारसा सकारात्मक परिणाम दिसून येत नाही. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, जानेवारी महिन्यात ८७, फेब्रुवारीत ७६ आणि मार्चमध्ये १०६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. म्हणजेच तीन महिन्यात एकूण २६९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे.

शासनाकडून अशा घटनांमध्ये मृत शेतकऱ्यांच्या वारसांना एक लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. आतापर्यंत ७९ प्रकरणांत ही मदत मंजूर करण्यात आली आहे, तर १३ प्रकरणे विविध कारणांमुळे अपात्र ठरवण्यात आली आहेत. उर्वरित १७७ प्रकरणे अद्याप चौकशीसाठी प्रलंबित आहेत.

**जिल्हानिहाय शेतकरी आत्महत्यांचे आकडे पुढीलप्रमाणे : बीड ७१, छत्रपती संभाजीनगर ५०, हिंगोली ३७, परभणी ३३, धाराशिव ३१, लातूर १८, जालना १३.**

# मराठी हा राज्याचा मानबिंदु; हिंदी अनिवार्य न करता ऐच्छिक राहणार –मंत्री दादासाहेब भुसे



**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. यात राज्यातील विद्यार्थी उद्याच्या स्पर्धेत कुठेही कमी पडू नयेत याचीही दक्षता घेतली जात आहे. सर्व शाळांमध्ये मराठी विषय बंधनकारक असून इंग्रजी भाषा शिकविण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला आहे. आता नवीन धोरण राबविताना सुकाणू समितीने घेतलेल्या निर्णयानुसार पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून हिंदी भाषा विषय अनिवार्य करण्यात आला होता. तथापि हिंदी भाषा विषय ऐच्छिक ठेवण्याबाबतचा सुधारित शासन निर्णय काढला जाईल, असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी स्पष्ट केले.

राज्यातील शालेय शिक्षण क्षेत्रात व्यापक आणि परिणामकारक सुधारणा घडवून आणण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने विविध महत्वाचे निर्णय घेतले आहेत. याबाबतची माहिती देण्यासाठी शालेय शिक्षण मंत्री श्री.भुसे यांनी मंत्रालयात पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, एससीईआरटी चे संचालक राहुल रेखावार उपस्थित होते.

शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली १०० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्यगीत म्हणून ‘गर्जा महाराष्ट्र माझा’ गीत सर्व शाळांमध्ये राष्ट्रगीतानंतर सन्मानपूर्वक गायले जाणार आहे. शाळांमध्ये पिण्याचे स्वच्छ पाणी, स्वच्छतागृहे, इमारतींची दुरुस्ती, वाचनालय, प्रयोगशाळा, खेळाचे मैदान अशा मूलभूत भौतिक सुविधा पुरवण्यावर भर देण्यात येत आहे. यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कॉपीमुक्त परीक्षा अभियान हे दहावी व बारावीच्या परीक्षांमध्ये यशस्वीपणे राबवले गेले असून भविष्यात कॉपीच्या प्रकरणांमध्ये दोषी ठरलेल्या शाळांना परीक्षा केंद्र मान्यता नाकारण्यात येईल.

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, राज्यभरातील सर्व शाळा व अंगणवाड्यांचे जिओटॅगिंग करण्यासाठी एमआरसॅक ॲपचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे. पीएमश्री शाळेच्या धर्तीवर राज्यात 'सीएम श्री' आदर्श शाळा उभारण्यात येणार आहे. तसेच ‘आनंद गुरुकुल’ उपक्रमाअंतर्गत प्रत्येक विभागात एक निवासी शाळा सुरू करून त्यात कला, क्रीडा व एआय () प्रशिक्षणासह स्पेशालिटी शिक्षण दिले जाईल.

शिक्षकांवरील शिक्षणबाह्य कामांचे ओझे कमी करण्यासाठी १५ समित्यांचे एकत्रीकरण करून आता फक्त चार समित्या ठेवण्यात आल्या आहेत. याचबरोबर आदर्श शिक्षक, चांगल्या शैक्षणिक संस्था यांची नोंद घेऊन त्यांचा अनुभव इतर शाळांना लाभावा, यासाठी कार्यवाही करण्यात येणार आहे.

# लातूर जिल्ह्याला राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानात तीन पुरस्कार



**लातुर (प्रतिनिधी) –** राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियानाचा उद्देश प्रशासकीय प्रक्रियांना गती देणे, नागरिकांना जलद आणि गुणवत्तापूर्ण सेवा प्रदान करणे आणि प्रशासनात नाविन्यपूर्ण उपाययोजना राबवणे हा आहे. या अभियानांतर्गत सन २०२३–२४ आणि २०२४–२५ या वर्षांसाठीचा पुरस्कार वितरण समारंभ आज मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडला. यामध्ये लातूर जिल्ह्यातील तीन उपक्रमांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कौशल्य विकास,उद्योजकता आणि नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक याची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती.

पुरस्कार निवडीसाठी कार्यालयीन व्यवस्थापनात आधुनिक संकल्पना आणि व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब, सेवांची गुणवत्ता आणि दर्जा यामधील सुधारणा, उपक्रमांची परिणामकारकता, लोकाभिमुखता, ई–गव्हर्नन्स, संसाधनांचा कार्यक्षम वापर, तक्रारमुक्त कार्यालय, तसेच नाविन्यपूर्ण आणि पथदर्शी संकल्पना, प्रयोग आणि उपक्रम यांचा विचार करण्यात आला.

# मुख्यमंत्री सहायता निधीची संपूर्ण सेवा ‘व्हॉट्सअप’वर उपलब्ध करा –मुख्यमंत्री



**मुंबई(प्रतिनिधी)–** राज्य शासनाच्या विविध सेवा व्हॉट्सअपवर उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने मेटासोबत सामंजस्य करार केला आहे. त्यानुसार मुख्यमंत्री सहायता निधीची संपूर्ण प्रणाली व्हॉट्सॲपवर उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. आरोग्यविषयक सर्व योजनांसाठी एकच पोर्टल आणि अर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री सहायता निधीबाबत सर्व सेवा व्हॉट्सॲपच्या माध्यमातून नागरिकांना सहज उपलब्ध होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री सहायता निधीसंदर्भात आज सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक झाली. या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक आदीसह डॉक्टर उपस्थित होते.

मुख्यमंत्री सहायता निधीसाठी आर्थिक तरतूद वाढविण्यासाठी ‘सीएसआर’ (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) मधून निधी घ्यावा. यासाठी संस्था स्थापन करण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करण्यात यावा. ही संस्था सीएसआर निधी मिळवून तो मुख्यमंत्री सहायता निधीसाठी नागरिकांच्या सेवेसाठी उपयोगात आणेल. ही संस्था मुख्यमंत्री सहायता निधी आणि सीएसआर यामध्ये मध्यस्थ म्हणून काम करेल. मुख्यमंत्री सहायता निधीची सेवा अधिकाधिक लोकाभिमुख करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करण्यात यावा, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, रुग्णसेवेत येत असलेल्या अडचणींवर मात करीत रुग्ण सेवेसाठी निधीचा जास्तीत जास्त उपयोग करावा. यासाठी रुग्णालयांची संलग्नता वाढवून जास्तीत जास्त रुग्णालये पॅनल करावी. मुख्यमंत्री सहायता निधी, महात्मा फुले जन आरोग्य योजना, प्रधानमंत्री आयुष्यमान भारत योजना यापैकी रुग्णाला कुठल्या योजनेचे लाभ मिळेल, यापूर्वी घेतलेला लाभ, कुठल्या आजारावर किती लाभ मिळाला याबाबत सर्व माहिती पोर्टलवर असावी.

गरजूला लाभ मिळाला पाहिजे, यासाठी पारदर्शकता आणावी. तालुकानिहाय रुग्णमित्र नियुक्त करावे. निधीबाबत सुधारित पोर्टल आणि टोल फ्री क्रमांक तयार करण्यात यावा. पोर्टलवर जियो टॅगिंग उपलब्ध करून दिल्यास रुग्णांना 'लोकेशन' नुसार जवळचे रुग्णालय शोधत उपचारासाठी सहज दाखल होता येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## पहलगाम येथे अडकलेल्या प्रवाशांसाठी विशेष रेल्वे

**मुंबई (प्रतिनिधी) –** पहलगाम घटनेच्या पार्श्वभूमीवर या ठिकाणी अडकलेल्या प्रवाशांची सोय व्हावी व वाहतूक समस्येवर तोडगा काढणे तसेच अतिरिक्त गर्दीची व्यवस्था करण्यासाठी श्री माता वैष्णो देवी (एसएमव्हीडी) कटरा येथून नवी दिल्लीकडे जाण्यासाठी विशेष रेल्वेची सेवा सुरू करण्यात आली आहे. या विशेष रेल्वेचे तिकिट कटरा, उधमपूर आणि जम्मू रेल्वे स्थानकावर मिळेल.

रेल्वे क्रमांक : ०४६१२ प्रस्थान स्थानक : श्री माता वैष्णो देवी कटरा प्रस्थान वेळा : कटरा – रात्री २१:२० उधमपूर – रात्री २१:४८ जम्मू – रात्री २३:००

ही विशेष रेल्वे अतिरिक्त प्रवासी भार कमी करण्यात आणि नवी दिल्लीकडे सुरक्षित व आरामदायक प्रवास सुनिश्चित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. रामबन येथे राष्ट्रीय महामार्ग एकेरी वाहतुकीसाठी कार्यान्वित करण्यात आला आहे.काश्मीर व जम्मू येथे अडकलेले प्रवाशी या विशेष रेल्वेने प्रवास करु शकतात. ही रेल्वे सकाळी ०९:३० वाजता नवी दिल्लीला पोहोचेल.

# राज्य आपत्कालीन कार्य केंद्रात दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती

**मुंबई (प्रतिनिधी) –** जम्मू व काश्मीर येथील पहलगाम येथे पर्यटकांवरील झालेल्या दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातील बाधित नागरिकांच्या मदतीसाठी राज्य आपत्कालीन कार्यकेंद्र (मंत्रालय नियंत्रण कक्ष) येथील कक्षात दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन संचालक सतीशकुमार खडके यांनी दिली.

राज्य आपत्कालीन कार्य केंद्राचे व्यवस्थापक विशेषकर सुर्यवंशी व कक्ष अधिकारी नितीन मसळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी अथवा त्यांच्या नातेवाईकांनी मदतीकरिता मंत्रालय नियंत्रण कक्ष येथील दूरध्वनी क्रमांक ०२२–२२०२७९९०/२२७९४२२९ व भ्रमणध्वनी क्रमांक ९३२१५८७१४३ (वॉट्सअप क्रमांक) तसेच आपत्कालीन संपर्क क्रमांक (टोल फ्री १०७०) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन खडके यांनी केले आहे.


## भाड्याने देणे आहे

उमरी रेल्वे स्टेशन येथील बसस्थानकाच्या पाठीमागील शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेली २ मजली इमारत हॉस्पीटलसाठी सुसज्य व सर्व सोयींनी युक्त एम.बी.बी.एस.,जनरल फिजीशीयन आणि सर्जन डॉक्टरसाठी भाड्याने देणे आहे.

–संपर्क नंबर–

मो.९४२३६२७०१६

७०८३७०४४७७

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा

डॉग डिलर

मोबाईल नंबर

९८५०६८८५२८


## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार रेखा साहेबराव गायकवाड रा.सरसम बु.ता.हिमायतनगर जि.नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून खालील प्रमाणे जाहीर प्रगअन देण्यात येते की,

माझ्या पक्षकाराने पावर्तीबाई भ्र.माधवराव लोकरे रा.सरसम बु. ता.हिमायतनगर जि.नांदेड यांच्याकडून त्याचे मालकी व ताब्यातील मालमत्ता जी .मौजे आंधेगाव ता.हिमायतनगर शिवारात असून खाते क्र.२१५ शेत गट नंबर २७७ पैकी ०.हेक्टर ६२ आर ज्याची चर्तुसिमा पुर्वेस–साईनाथ शिंदे यांची शेती, पश्चिमेस – देविदास रामजी विठ्ठलवाड यांची शेती, दक्षिणेस–सावित्राबाई दत्ता वडेवाड यांची शेती उत्तरेस बसाजी गायकवाड यांची शेती

सदरील वर्णनाच्या चर्तुसिमेच्या आतील जमिन आंतरिक व बाह्य हक्कासहित माझ्या खरेदी करण्याचा करार केला आहे. त्या करारापोटी काही रक्कम घेवून सौदाचिठ्ठी करून घेतली आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, सदर माझे पक्षकाराचे व्यवहाराबाबत कोणाचा काही आक्षेप, उजर, हितसंबंध,गहाण, तारण कर्ज, बोजा,बक्षीस पत्र, भेट, कुळ इत्यादी असल्यसास त्यांनी तसा लेखी आ–क्षेप, उजर हरकत,सबळ कागदोपत्री पुराव्यासह हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून ७ सात दिवसांच्या आत खालील दिलेल्या पत्यावर नोंदवावा. अन्यथा विहीत मुदतीनंतर माझे पक्षकार सदर प्लॉटचे नोंदणीकृत विक्रीखत करून देतील व मुदतीनंतर आलेले आक्षेप माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाहीत.याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन

**मार्फत**
**ॲड.अतुल वानखेडे**
**जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड**
**मो.९१४५३१७६६१**

**जाहीर प्रगटन देणार**
**रेखा साहेबराव गायकवाड**
**रा.सरसम बु.ता.हिमायतनगर**
**जि.नांदेड**

## जाहीर प्रगटन

| | |
|---|---|
| वेबसाई .www.nanded.gov.in | ई मेल–tabhokar@gmail.com |
| शाखा जमाबंदी २/जमिन | दुरध्वनी–०२४६२ २२२६२२ |
| क्र.२०२५/ शाखा जमाबंदी २/जमिन | दिनांक २/४/२०२५ |

**प्रति**
**ग्राम महसुल अधिकारी सज्जा हाडोळी**

विषय –मौजे हाडोळी येथील गट नंबर ०१ मधील इतर अधिकारातील नमुद साधे कुळे इरबा बसप्पा राज्या गोविंदा (११५) त.न.दोन व पा.का.नाही (११५) दो.न.व पा. (११५) स.कुळ तहसिल त.न. (११५) अशी ही नोंद कमी करणे बाबत.

संदर्भ– अर्जदार श्री शिवलीला संजय जाधव रा.हाडोळी ता.भोकर जि.नांदेड यांचा अर्ज दिनांक ७/३/२०२५

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रकाचे अनुषंगाने अर्जदार श्री शिवलीला संजय जाधव रा.हाडोळी ता.भोकर जि.नांदेड यांनी मौजे हाडोळी येथील गट नंबर ०१ मधील इतर अधिकारातील नमुद साधे कुळ इरबा बसप्पा राज्या गोविंद (११५) त.न.दोन व पा.का. नाही (११५) दो.न.पा. (११५) स.कुळ तहसील त.न. (११५) अशी ही नोंद कमी करणे बाबत या कार्यालयास विनंती अर्ज सादर केला आहे.

त्याअनुषगाने आपणास कळविण्यात येते की, या सोबत जाहीर प्रगटन देण्यात येत असून सदर जाहीर प्रगटन ग्रामपंचायत कार्यालय तलाठी सज्जा कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर तसेच गावातील व्हॉटसॲप ग्रुपवर पाठवून तसा पंचनामा व अहवाल स्क्रीनशॉटसह या कार्यालयास सादर करावा. जेणेकरून प्रकरणात पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल.

**(विनोद गुंडमवार)**
**तहसीलदार भोकर**

# १० कोटींचा बँक घोटाळा; वरिष्ठ मॅनेजर, उद्योजक व एजंटला ५ वर्षांची शिक्षा

**मुंबई (प्रतिनिधी) –** तब्बल १० कोटी रुपयांच्या बनावट ‘लेटर ऑफ क्रेडिट’ () प्रकरणात सीबीआय न्यायालयाने तीन जणांना ५ वर्षांची सक्तमजुरी सुनावली आहे. या प्रकरणात विजया बँकेचे तत्कालीन वरिष्ठ व्यवस्थापक दामोधर कामत, माधव एंटरप्रायझेसचे मालक निखिल पट आणि एजंट सुरज तायडे दोषी ठरले.

या घोटाळ्याची सुरुवात २०१२ मध्ये झाली होती. कामत यांनी बनावट जारी केल्यावर बँक ऑफ इंडियाच्या विलेपार्ले शाखेकडून १० कोटी रुपये मंजूर झाले. पाचवे देताना संशय आल्याने चौकशी झाली आणि फसवणुकीचा पर्दाफाश झाला. विशेष न्यायाधीश ए. व्ही. खरकर यांनी १७ एप्रिल रोजी दिलेल्या निकालात कामत यांना भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याखाली दोषी ठरवत १५ लाख दंड ठोठावला. निखिल पट यांना ८ कोटींचा दंड आणि सुरज तायडे यांना ३० लाखांचा दंड सुनावण्यात आला आहे.

या प्रकरणात एक आरोपी मृत असून दोन फरार आहेत. सात आरोपींपैकी एका आरोपीची निर्दोष मुक्तता झाली.

दरम्यान, देशाच्या आर्थिक रचनेवर घात करणाऱ्या पांढरपेशा गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्यामुळे कठोर शिक्षा देणे आवश्यक होते, असे न्यायालयाने नमूद केले.

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# हबीब टॉकीज ते जुना गंज रस्त्याने घेतला मोकळा श्वास

## ▸ महानगरपालिका व पोलीस विभागाची धडक करवाई ▸ १२० अतिक्रमणधारकांवर कारवाई, चार ट्रक माल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** जुन्या नांदेड भागातील मुख्य बाजारपेठ असलेला व अतिशय दाटीवाटीचा रस्ता म्हणून ओळखला जाणारा हबीब टॉकीज ते बर्की चौक ते जुना गंज (पहेलवान टी हाऊस) या रस्त्यावरील रस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या अतिक्रमणधारकांवर महानगरपालिकेने कारवाईचा बडगा उगारला. बुधवारी (दि.२३) महानगरपालिकेच्या अतिक्रमण निमूलन पथक व पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे धडक कारवाई करुन या परिसरातील रस्त्याच्या दोन्ही बाजुने झालेले अतिक्रमण काढून टाकले आहे.







काही दिवसांपासुन महानगरपालिका व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने शहरातील अनधिकृतपणे अतिक्रमण केलेल्या अतिक्रमणधारकांवर धडक मोहिम सुरु आहे. त्याचाच भाग म्हणून हबीब टॉकीज ते बर्की चौक ते जुना गंज या रस्त्यावरील अतिक्रमणे काढून टाकण्याची कारवाई सुरु करण्यात आली आहे. या कारवाईत जेसीबीच्या सहाय्याने १२० अतिक्रमण धारकांवर कारवाई करण्यात आली तसेच तब्बल ४ ट्रक माल जप्त करण्यात आला आहे.

मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार व अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली उपआयुक्त अजितपालसिंघ संधु यांच्या नेतृत्वात अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई पार पाडली.

या कारवाईत उपविभागीय पोलीस अधिकारी सुशिलकुमार नायक, इतवारा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शिंदे, अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त रावण सोनसळे, क्षेत्रिय अधिकारी रमेश चवरे, डॉ. मिर्झा फरहतुल्ला बेग, राजेश जाधव, गौतम कवडे, अग्निशमन अधिकारी के.जी. दासरे, अतिक्रमण पथक प्रमुख विशाल सोनकांबळे, अनिल चौदंते यांच्यासह महापालिकेचे ६० कर्मचारी तसेच पोलीस विभागातील ५० कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

महानगरपालिका हद्दीत मुख्य रस्त्यावर व्यापाऱ्यांनी व नागरीकांनी कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण न करता रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता घेण्याचे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात येत आहे. शहरातील मुख्य रस्ते अथवा इतरत्र अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीतांवर दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा मनपा प्रशासना तर्फे देण्यात आला आहे. यापुढे सुध्दा महानगरपालिका व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने शहरातील अतिक्रमण धारकांवर कारवाई करण्याची मोहिम सुरुच राहील, असे मनपा उपआयुक्त अजितपालसिंघ संधु यांनी सांगितले आहे.

# उष्णतेपासून नागरिकांनी दक्षता घेण्याचे महापालिकेचे आवाहन

**नांदेड़ (प्रतिनिधी)–** शहर व परिसरात तापमानाचा पारा वाढत आहे. या पार्श्वभूमीवर, शहर आणि परिसरातील नागरिकांचे उष्माघातापासून संरक्षण व्हावे, यासाठी महानगरपालिकेच्या आरोग्य विभाग नागरिकांना खालीलप्रमाणे आवश्यक ती काळजी घेण्यासाठी आवाहन केले आहे.

**उष्माघाताची लक्षणे ओळखा:** शरीराचे तापमान वाढणे (१०२ फॅरेनहीट किंवा त्याहून अधिक), त्वचा लाल होणे आणि कोरडी पडणे, घाम न येणे, तीव्र डोकेदुखी, मळमळ आणि उलटी, चक्कर येणे आणि अशक्तपणा जाणवणे, हृदयाचे ठोके वाढणे, श्वास घ्यायला त्रास होणे, गोंधळ उडणे किंवा बेशुद्ध होणे.

**उष्माघातापासून बचाव करण्यासाठी खालील उपाययोजना करा:** जास्त प्रमाणात पाणी प्या, दिवसभरात नियमितपणे पाणी प्या. लिंबू सरबत, नारळ पाणी, ताक यांसारख्या पेयांचा आहारात समावेश करा. हलके आणि सुती कपडे वापरा: फिकट रंगाचे, सैलसर आणि हवा खेळती राहतील असे कपडे परिधान करा.

**उन्हात जाणे टाळा:** विशेषतः सकाळी ११ ते सायंकाळी ४ या वेळेत उन्हात जाणे शक्यतो टाळा.

**डोक्याचे संरक्षण करा:** उन्हात बाहेर पडताना टोपी, स्कार्फ किंवा छत्रीचा वापर करा. **थंड ठिकाणी राहा:** घरात किंवा थंड वातावरणात राहण्याचा प्रयत्न करा. पंखा, कूलर किंवा वातानुकूलित यंत्राचा वापर करा. **जड आणि तेलकट अन्न टाळा:** पचनास हलके असलेले आणि ताजे अन्न घ्या. **मद्यपान आणि चहा–कॉफी टाळा:** या पेयांमुळे शरीरातील पाण्याची पातळी कमी होते.

**शारीरिक श्रमाचे काम टाळा:** उन्हाच्या वेळी जास्त शारीरिक श्रम करणे टाळा. वाहनात काळजी घ्या: बंद असलेल्या वाहनात लहान मुले, वृद्ध आणि पाळीव प्राणी यांना ठेवू नका. **आजारी व्यक्तींची विशेष काळजी घ्या:** लहान मुले, वृद्ध आणि गर्भवती महिला यांना उष्माघाताचा धोका अधिक असतो, त्यांची विशेष काळजी घ्या.

**उष्माघात झाल्यास त्वरित काय करावे:** उष्माघात झालेल्या व्यक्तीला थंड आणि हवेशीर ठिकाणी घेऊन जा, त्यांचे कपडे सैल करा. कपाळावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवा किंवा बर्फ लावा. ओआरएस किंवा लिंबू पाणी द्या. त्वरित जवळच्या महापालिका आरोग्य केंद्रात किंवा नजीकच्या डॉक्टरांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**नांदेड :** पहलगाम येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांवर भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ वजिराबाद चौकात शिवसेना ठाकरे गटाच्यावतीने पाकिस्तानाचा निषेध करत पाकिस्तानी ध्वजाचे दहन करण्यात आला. यावेळी गौतम जैन, शैलेशसिंह रावत, भाया शर्मा, संदीप कासलीवाल, चरण परदेसी, रवी कामले, किरण इटकर, नितीन सरोदे, गणेश शिंदे, सूरज नवघरे, अंकुर पटेल आदी दिसत आहेत. (छाया : नरेंद्र गडप्पा)

# जम्मू काश्मीरातील दहशतवादी हल्ल्याचा हडकोमध्ये सर्वपक्षीय निषेध

**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –** जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ हडको येथे सर्व पक्षीय, सामाजिक राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी व पत्रकार यांच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी भारत माता की जय, वंदे मातरम् घोषणा देण्यात आल्या.



जम्मू काश्मीर येथील पर्यटकांवर दि. २२ एप्रिल रोजी दहशतवादी हल्ला करण्यात आला. यात भारतातील महाराष्ट्रासह अनेक राज्यांतील पर्यटक गोळीबारात मृत्यूमुखी झाले. तर अनेक जण गंभीर जखमी झाले. या झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ हडको येथे २३ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता सर्व पक्षीय हडको येथे श्रध्दांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास व भारत माता प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. नंतर श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यावेळी भारत माता की जय, वंदे मातरम् घोषणा देण्यात आल्या.

यावेळी संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, डॉ. नरेश रायेवार, डॉ. अशोक कलंत्री, राजु लांडगे, विनोद कांचनगिरे, भि. ना. गायकवाड, सचिन रावका, सम्राट आढाव, गजानन चंदेल,शाहीर गौतम पवार, चंचलसिंग जाट, विठ्ठल गायकवाड, डुमणे, प्रमोद रेवणवार, राजन जोजारे, भुजंग मोरे, विनोद पाटील यांच्यासह ग्रामीण पोलीस स्टेशन वाचक शाखेचे बालाजी दंतापल्ले, बालासाहेब टरके, पोहेकॉ मारोती माने यांच्या सह जेष्ठ नागरिक, विविध प्रतिष्ठानाचे नागरीक, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आयचर टेम्पो- दुचाकी अपघातात दुचाकीस्वार ठार; छत्रपती चौकातील घटना

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील छत्रपती चौकात एका दुचाकीस्वारास टेम्पोने धडक दिल्याने दुचाकीस्वार मागच्या टायरखाली आल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना २३ एप्रिल रोजी दुपारी तीनच्या सुमारास घडली.

आसरानगर भागातील अमीन शेख (वय ४०) हा युवक दुचाकीवरून तरोडा नाक्याकडे जात असताना समोरून येणाऱ्या टेम्पोने (एमएच१४– ईएम –३१३८) अमीन शेख याच्या दुचाकीस जोराची धडक दिली. या धडकेत अमीन शेख हा मागच्या टायरखाली आल्याने चिरडून त्याच्या जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर छत्रपती चौकात प्रचंड वाहतुकीची कोंडी झाली. भाग्यनगर व शहर वाहतूक शाखेच्या पोलिसांनी घटनास्थळी जाऊन मृतदेह ताब्यात घेतला. विस्कळीत झालेली वाहतूक सुरळीत केली. घटनेनंतर टेम्पो चालक पसार झाला. पोलिसांनी टेम्पो जप्त केला असून भाग्यनगर पोलीस ठाण्यात रात्री उशिरा टेम्पो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भाग्यनगरमध्ये मटका तर अर्धापूरमध्ये जुगार अड्ड्यावर पोलिसांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मटका खेळणाऱ्या तर अर्धापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या एका जुगार अड्ड्यावर कारवाई करून आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.

शहराच्या नवोदया मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटलसमोर कॅनॉल रस्त्यावर रवीसिंग अशोकसिंग ठाकूर (वय ४२ रा. विद्युतनगर नांदेड) २२ एप्रिल रोजी रात्री कल्याण नावाचा मटका जुगार खेळवीत होता. पोलीस अंमलदार संजय घोरपडे यांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून नगदी दोन हजार रुपये व जुगाराचे साहित्य जप्त केले. या प्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात रवीसिंग ठाकूरविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार तोडसाम करत आहेत.

दुसऱ्या घटनेत अर्धापूर शहरातील निलोफर कॉलनीजवळ शेख नुमान शेख रज्जाक (वय २५ रा. आगापुरा अर्धापूर), माधव दगडू कदम (वय २६ रा. कृष्णानगर अर्धापूर) आणि नागेश उर्फ लड्या उत्तमराव लडे (वय २५ रा. मेंढला बुद्रुक ता. अर्धापूर) यांना झन्ना मन्ना नावाचा जुगार खेळतांना अटक केली व जुगार अड्ड्यावरून १८०० रुपये आणि जुगाराचे साहित्य जप्त केले. पोलीस अंमलदार विजय कदम यांच्या फिर्यादीवरून अर्धापूर पोलीस ठाण्यात वरील तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार बोदेमवाड करत आहेत.

तसेच २१ एप्रिलच्या रात्री ११ च्या सुमारास लोहा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात बालाजी विश्वनाथ चिडाळकर (वय २३ रा.नगरेश्वरमंदिर परिसर) याला क्रिकेट मॅचवर मोबाईलच्या माध्यमातून सट्टा जुगार खेळवतांना ताब्यात घेतले. त्याच्याकडून २ हजार १५० रुपये व एक मोबाईल असा मुद्देमाल २२ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड यांच्या फिर्यादीवरून लोहा पोलीस ठाण्यात बालाजी चुडाळकरविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार लाडेकर करत आहेत.




**नांदेड :** नांदेड उत्तरचे आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी महावितरणचे अधीक्षक अभियंता जाधव व अन्य अधिकाऱ्यांसोबत शासकीय विश्रामगृहात बैठक घेऊन सूचना दिल्या. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे, दर्शनसिंघ सिद्धू, राजू गुंडावार, माजी नगरसेवक शाम कोकाटे, धम्मपाल कदम, संदीपसिंघ गाडीवाले, राजेश चव्हाण, शाम वानखेडे, एकनाथ कल्याणकर, विकास देशमुख तरोडेकर, शिवराज पुयड आदी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

# दहशतवादी हल्ल्याचा किनवट भाजपकडून निषेध



**किनवट (प्रतिनिधी) –** कश्मिरचे निसर्ग सौंदर्य पाहण्यासाठी गेलेल्या २६ पर्यटकांवर पहेलगाम येथे दहशतवाद्यांनी अंदाधुंद गोळीबार करुन निर्घृण हत्या केली. या भ्याड हल्ल्यात मृत पावलेल्यांना श्रद्धांजली म्हणून किनवट भाजपच्यावतीने कॅंडल मार्च काढून जिजामाता चौकात निषेध सभा घेण्यात आली.

भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध करून अतिरेक्यांचा शोध लावून त्यांना फासावर लटकविण्याची मागणी केली. यावेळी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, भाजपाचे शहराध्यक्ष स्वागत आयनेनीवार, दक्षिण मंडळाध्यक्ष उमाकांत कऱ्हाळे पाटील, संदीप केंद्रे, प्रमोद पोहरकर, वैजनाथ करपुडे पाटील, संजय सिडाम, सतीश बिराजदार, पंकज तिरमनवार, विश्वास कोल्हारीकर, कृष्णा कलकुंटवार, रमेश बद्दीवार, आजय चाडावार, सुनील मच्छेवार, शिवा क्यातमवार, बालाजी धोतरे, शिवा आंधळे, नरसिंग तक्कलवार, सुमीत इटकेपल्लीवार, निकेतन सुरोशे, कृष्णा पाटील, राहुल दारगुलवार, केतन कऱ्हाळे, जय वर्मा, विक्रांत दगुलवार, सुनील चव्हाण, अक्षय पेंशनवार, निसार भाटी यांच्यासह भाजपा कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# बालाजी दमकोंडवार यांचे निधन



**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा येथील कै. बालाजी दत्तात्रय दमकोंडवार यांचे दि. २२ एप्रिल रोजी दुपारी ०४:०५ वाजता निधन झाले. त्यांच्यावर दि. २३ रोजी सकाळी नांदेड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, चार भाऊ व नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# गंगाधर ब्यागलवर यांचे निधन



**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** येथील शेतकरी गंगाधर रामलू ब्यागलवर (वय ५३) यांचे दि. २३ एप्रिल रोजी सर्पदंशाने निधन झाले. त्यांच्यावर दि. २३ रोजी सायंकाळी ५ वाजता कुंडलवाडी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, असा मोठा परिवार आहे.

# शांताबाई मोरे यांचे निधन



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील बारसगाव येथील ज्येष्ठ महिला शांताबाई भुजंग मोरे (वय ६५ वर्षे) यांचे वृद्धापकाळाने दि.२३ रोजी निधन झाले. त्यांच्यावर दि.२४ रोजी सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सुना, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे.ते बबन भुजंग मोरे यांच्या त्या मातोश्री होत.

# एसबीआय एससी/एसटी/बीसी एम्प्लॉइज वेल्फेअर असोसिएशनच्यावतीने स्कूलबॅगचे वाटप



**नांदेड (प्रतिनिधी)–** एसबीआय एससी/एसटी/बीसी एम्प्लॉइज वेल्फेअर असोसिएशन नांदेड (सेवा) च्यावतीने पंचशील विद्यालयात विद्यार्थ्यांना दि २३ एप्रिल २०२५ रोजी स्कूलबॅगचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास उपमहाव्यवस्थापक एसबीआय नांदेड प्रीयकुमार सरीगला, सहाय्यक महाव्यवस्थापक नांदेड पक्काला कालीदासु, मुख्य विभागीय सचिव अधिकारी संघटना नांदेड किरणकुमार जिंतुरकर, अध्यक्ष सेवा संघटना सदाशिव चाळणेवाड, सचिव सेवा संघटना श्रीमती शिल्पा जिंतुरकर, अनुप फाटे, रजत कुमार यांसह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी प्रीयकुमार सरीगला, पक्काला कालीदासु आणि श्रीमती शिल्पा जिंतूरकर ह्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

शाळेतील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सेवा संघटना नांदेडचे तत्पर कर्मचारी कपील ढवळे, अविनाश अंबेराव, बालाजी अकुलवार, गिरीश विठ्ठलराव भाटे आदिंनी परिश्रम घेतले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com